12 ACRES OF N.A. LAND FOR SALE IN NERAL, TALUKA KARJAT
Flat Land, located in a Residential Zone, just 7 kms from Neral Station. Ideal for plotting Scheme Development, Bungalow Scheme, Resort, or Housing Project.
PANVEL LAND FOR SALE
10 acres of land, located 4 kms from Shedung Toll Plaza, with 800 meters of Frontage on the Mumbai-Pune Highway. Just 10 kms from Phalaspe Phata. In Commercial Zone Under MSRDC DP.
For pricing & details call 9867008432

# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. २० जुलै २०२४

किंमत ४ ₹

पडघे विभागीय शिक्षण संस्था
संजय गांधी स्मारक हायस्कूल व जुनियर कॉलेज, कोलवाडी/पाले (बुद्रुक), तालुका -पनवेल, जिल्हा रायगडमधील
ज्युनियर कॉलेजसाठी (एम.एस.सी.-बी.एड.-जीवशास्त्र) शिक्षक पदासाठी
इच्छुकांनी मुलाखतीसाठी मंगळवार, दिनांक २३ जुलै २०२४ पर्यंत वरील पत्त्यावर प्राचार्यांकडे संपर्क साधावा.
मोबाईल नं -९५९४८१३९६५



# भूमीपूजन थाटात, रस्ता गटारात



## ■ खासदार, आमदारांचा दिखावा ठरतोय सुरईकरांना त्रासदायक




। अलिबाग । प्रतिनिधी ।

करोडो रुपयांचा निधी आणून विकास केल्याचा गाजावाजा विद्यमान आमदारांकडून मोठ्या प्रमाणात केला जात आहे. मात्र, प्रत्यक्षात उंटावरुन शेळ्या हाकणे, अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे चित्र दिसून येत आहे. मुरूड तालुक्यातील बोर्लीकडून सुरईकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामाचे भूमीपूजन विद्यमान आमदारांच्या हस्ते सहा महिन्यांपूर्वी झाले. मात्र, भूमीपूजनाचा फलक लावण्यापलीकडे अजून काहीही झालेले नसल्याने परिसरातील नागरिकांत तीव्र संताप आहे. त्यामुळे सुरईकडे जाण्याचा मार्ग खडतर बनला आहे.

बोर्ली स्थानकापासून सुरईकडे जाणारा रस्ता खड्ड्यात आहे. पावसाळ्यात या रस्त्याला तळ्याचे स्वरूप निर्माण होते. •› पान २ वर

> संबंधित रस्ता रायगड जिल्हा परिषदेच्या अखत्यारित येतो. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत तो मंजूर आहे. मोऱ्यांचे काम सुरु आहे. त्यामुळे या रस्त्याचे काम थांबले आहे. मोऱ्यांची कामे पूर्ण झाल्यावर रस्त्याच्या कामाला सुरुवात होईल. आरोग्य केंद्रापर्यंतचे काम पूर्ण झाले आहे. पावसाळ्यात सुरईमधील नागरिकांना त्रास होत आहे. परंतु, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत निधी मंजूर असल्याने जिल्हा परिषदेमार्फत रस्त्याच्या दुरुस्तीसह नूतनीकरणाचे काम करू शकत नाही.
> – आशिष मुकणे, उपअभियंता, मुरुड

> अद्याप रस्त्याचे काम केले नाही. भूमीपूजन होऊन सहा महिने झाले आहेत. तरीदेखील कामाला मुहूर्त लागला नाही. त्यामुळे पावसाळ्यात मोठी गैरसोय झाली आहे. रस्त्याला तळ्याचे स्वरूप निर्माण होत आहे.
> – सुरई ग्रामस्थ

# अजित पवार गटाचा दर्जा घसरला

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।


नुकत्यात पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीतील मतांच्या संख्या लक्षात घेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला (अजित पवार) राष्ट्रीय दर्जा काढून घेत राज्यस्तरीय पक्षाचा दर्जा देण्याचा निर्णय केंद्रीय निवडणूक आयोगाने घेतला आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादी अजित पवार गटाला हा मोठा दणका असल्याचे बोलले जात आहे. तर, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार, शिवसेना (उबाठा) या दोन पक्षांना निवडणूक आयोगाने राज्यस्तरीय पक्षाचा दर्जा दिला आहे.

शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये फूट पडल्यानंतर यामधील शरद पवार आणि उद्धव ठाकरेंच्या पक्षाला चिन्ह देण्याचा निर्णय या अगोदर आयोगाने घेतला होता. त्यानंतर आता या पक्षांना राज्यस्तरीय पक्षाचा दर्जा देण्याचा निर्णयही निवडणूक आयोगाने घेतला. कोणत्याही राजकीय पक्षाला राज्य आणि राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता देताना लोकप्रतिनिधींना मिळालेल्या मतांची संख्या लक्षात •› पान २ वर

### पिपाणी चिन्ह गोठवले



विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला दिलासा मिळाला आहे. निवडणूक आयोगाने निवडणुकीत अपक्षांना दिले जाणारे पिपाणी चिन्ह गोठविले आहे. राष्ट्रवादीच्या फुटीनंतर शरद पवार गटाला तुतारी चिन्ह मिळाले आहे. त्यामुळे या चिन्हाशी साधर्म्य असलेले पिपाणी चिन्ह गोठविण्याची मागणी केली होती.




# शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी शेकाप कटिबद्ध

## चित्रलेखा पाटील यांचे प्रतिपादन


● (छायाचित्र : अमोल नाईक)

। अलिबाग । प्रतिनिधी ।

युवा ग्रामसुधार समिती धाकटे शहापूर आणि शेतकरी संघर्ष समिती पेझारी तसेच पाच गावांतील शेतकरी व भूमीपुत्रांनी शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी लढणाऱ्या शेतकरी कामगार पक्षाच्या जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांची शुक्रवारी (दि.१९) भेट घेतली. दरम्यान, शेकाप सदैव शेतकऱ्यांच्या पाठीशी उभा राहून न्याय मिळवून देईल, असा विश्वास चित्रलेखा पाटील यांनी दिला.

दरम्यान, शासनामार्फत भूसंपादनाची प्रक्रिया राबवताना शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या शेतीच्या बाजारमूल्याची २०१३च्या भूमी अधिग्रहण कायद्याप्रमाणे रेडीरेकनरच्या दरापेक्षा चार पटीने भाव विकासकाने अर्थात संपादन संस्थेने दिला पाहिजे, एमआयडीसीने पूर्व संपादित अधिग्रहण केलेली २००७ साली टाटा विद्युत •› पान २ वर

# मायक्रोसॉफ्टच्या सर्व्हरमध्ये बिघाड

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

मायक्रोसॉफ्टच्या सर्व्हरमध्ये अचानक मोठा बिघाड झाला असून, त्याचा विमानसेवेला मोठा फटका बसला. विमान कंपनीच्या सकाळी १०.४५ पासून चेक इन यंत्रणेत तांत्रिक बिघाड झाला. यामुळे जगभरातील विमानसेवा खोळंबली. याचा फटका इंडिगो, अकासा आणि स्पायजेट या विमान कंपन्यांना बसला. ही तांत्रिक समस्या सोडवण्यासाठी मायक्रोसॉफ्टचे उशिरापर्यंत काम सुरू होते.

# तालुक्यात शिक्षणाचा बोजवारा

## जबाबदार अधिकारी नाही, शिक्षणाचा गाडा कोण हाकणार?

### ■ २०१५ पासून गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी पदे रिक्त

। म्हसळा । वार्ताहर ।

शिक्षण हे वाघणीचे दूध म्हणणारे सरकार शिक्षणाचे हेळसांड करताना दिसत आहे. गावोगावी शिक्षण प्रणालीचे कार्य राबवण्याचे कार्य सरकार करत असताना त्याच्यावरती कोट्यवधी रुपयांचा खर्चदेखील केला जातो आणि तो केलेला खर्च शेवटच्या विद्यार्थ्यांच्या घटकापर्यंत पोहचतो की नाही याची पूर्वतपासणी करण्यासाठी प्रशासनाने शिक्षक, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी आणि संपूर्ण शिक्षण विभागावर नियंत्रण ठेवण्यासाठी गटशिक्षण अधिकारी नियुक्ती केली असते; परंतु ह्या नियंत्रण पद्धतीचा म्हसळा तालुक्यात खेळखंडोबा झाला आहे.

तालुक्यामध्ये अकरा केंद्र तर दोन बीट असे असताना आज एकही कायस्वरुपी केंद्रप्रमुख नाही. एकूण दोन बीट असून, एकाही बिटाला गेली अनेक वर्षे विस्तार •› पान २ वर

### महत्त्वाची पदे रिक्त

गटशिक्षणाधिकारी १, वरिष्ठ विस्तार अधिकारी १, कनिष्ठ विस्तार अधिकारी १, केंद्रप्रमुख ११, मुख्याध्यापक ४, वरिष्ठ सहाय्यक १, कनिष्ठ सहाय्यक १, शिपाई १

# पेण शहर पाण्याखाली



। पेण । प्रतिनिधी ।

मागील दोन दिवसांपासून पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे भोगावती नदी पूर पातळी सोडून वाहत आहे. दरम्यान, पेण शहर पाण्याखाली गेले आहे. नैसर्गिक नाले व खाड्यांमध्ये •› पान २ वर

> भोगावती नदीवर पूर्ण अधिकार हा जलसंपदा खात्याचा आहे. नदीच्या पात्रात अतिक्रमण केल्यास आम्ही दंडात्मक कारवाई करु शकतो. मात्र, कायदेशीर कारवाई ही जलसंपदा कार्यालयाने करणे गरजेचे आहे. आम्हाला काही मर्यादा आहेत. मात्र, पेण शहरातील पूरसदृश्य परिस्थितीवर मी लक्ष ठेवून आहे.
> – तानाजी शेजाळ, तहसीलदार



# कुंभे परिसरालाही १४४ कलमाचे लॉक

### ■ पर्यटकाच्या मृत्यूनंतर शासनाला जाग

### ■ सिक्रेट पॉईंट, ताम्हिणी घाट, देवकुंडसह कुंभेलाही मनाई

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव तालुक्यातील भिरा गावाच्या हद्दीतील देवकुंड धबधबा, सणसवाडीतील सिक्रेट पॉईंट, ताम्हाणी घाट व आजूबाजूच्या एक कि.मी. परिसरात जाण्यास यापूर्वीच बंदी घालण्यात आली आहे. दरम्यान, कुंभे येथील दरीत पाय घसरुन पडल्याने मुंबईतील तरुणीचा दुर्दैवी मृत्यू झाल्यानंतर प्रशासनाला जाग आली असून, याठिकाणीसुद्धा प्रतिबंधात्मक आदेश लागू करीत १४४ कलमाचे लॉक लावले आहे. त्यामुळे वर्षासहलीसाठी येणाऱ्या पर्यटकांच्या उत्साहावर पाणी पडले आहे.

माणगाव तालुक्यातील प्रसिद्ध असलेल्या पर्यटन स्थळी कोणतीही दुर्घटना घडू नये म्हणून शासनाच्या वतीने खबरदारीची उपाययोजना म्हणून माणगाव उपविभागीय दंडाधिकारी डॉ. संदीपान सानप यांनी देवकुंड धबधबा, सिक्रेट पॉईंट, ताम्हाणी घाट व आजूबाजूचा १ कि.मी. परिसर आणि त्यानंतर आता कुंभे जलविद्युत प्रकल्प परिसरात दि. १६ जुलै ते ३० सप्टेंबर या कालावधीसाठी प्रतिबंधात्मक आदेश लागू करीत १४४ कलमाचे लॉक लावले आहे. वास्तविक देवकुंड, ताम्हिणी घाट व सिक्रेट पॉईंट येथील धबधबा व परिसरात पर्यटकांना बंदी ज्या दिवशी घातली होती, त्या दिवशी कुंभे जलविद्युत प्रकल्पच्या परिसरात बंदी घालण्याची गरज होती. या दुर्घटनेपूर्वी परिसरात बंदी घातली असती, तर या युवतीचा प्राण वाचला असता, अशी पर्यटकांतून चर्चा आहे. •› पान २ वर



अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२० जुलै

१) श्री. दिनेशकुमार कन्हय्यालाल वर्मा
श्रीबाग-२, अलिबाग, २०-०७-१९४८
२) श्री.मोतीराम महादेव पोरे
कोळीवाडा, अलिबाग, २०-०७-१९५४

कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



**श्री. अमेय शशिकांत वाकडे, वाढदिवस, अलिबाग**

# अन् अश्रुंचा बांध पुन्हा एकदा फुटला

## इर्शाळवाडी दुर्घटनाग्रस्तांना श्रद्धांजली

**। रसायनी । वार्ताहर ।**

**१९ जुलै २०२३ रोजीच्या कालरात्री इर्शाळवाडीची भयानक दुर्घटना घडून ८४ जणांचा मृत्यू झाला होता. आज एक वर्ष पूर्ण होत असताना मृत्युमुखी पडलेल्या वारसांच्या नातेवाईकांच्या अश्रूंचा बांध फुटला आणि एकच शांतता पसरली होती. हे भयानक चित्र आज इर्शाळवाडी येथील कंटेनर हाऊसमध्ये श्रद्धांजली अर्पण कार्यक्रमात दिसून आले.**


(छायाचित्र : राकेश खराडे)

इर्शाळवाडीचा डोंगर कोसळून भूस्खलन झाल्याने ८४ जणांचे जीव मातीत गेले, तर ८३ जनावरेदेखील दगावली. ४९ घरे आणि ७ गुरांचे गोठे यांची हानी झाली. या दुर्घटनेला आज एक वर्ष पूर्ण झाल्याने तात्पुरत्या कंटेनर हाऊस येथे बांधण्यात आलेल्या सभागृहात श्रद्धांजली अर्पण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी मृतांच्या आठवणींनी अश्रू अनावर झाले होते. उपविभागीय अधिकारी अजित नैराळे, तहसीलदार आयुब तांबोळी, अप्पर तहसीलदार पूनम कदम, उपअभियंता प्रशांत राखाडे, अपघातग्रस्त मदत टीमचे गुरुनाथ साठेलकर व त्यांची टीम, नायब तहसीलदार सुधाकर राठोड, समाजसेवक सचिन ओसवाल, चौक सरपंच रितू ठोंबरे, विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल, पोलीस निरीक्षक मोरे, मंडळ अधिकारी अशोक सुसलादे, तलाठी मुग्धन, कावरखे, अभिजित हिवरकर, पांपटवार, ग्रामविकास अधिकारी एस.पी. जाधव, मृतांचे वारस व नातेवाईक, मित्रपरिवार, विविध विभागाचे शासकीय अधिकारी, कर्मचारी, चौक ग्रामपंचायत सदस्य, सेवाभावी संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तत्पूर्वी, ८४ जणांचे सामुदायिक वर्षश्राद्ध करण्यात आले. आपल्या मृतांच्या आत्म्याला शांती समाधान मिळावे, अशी प्रार्थना करताना सर्वांनाच अश्रू अनावर झाले होते. यात जी २२ बालके आपल्या आईबाबांना मुकली आहेत, त्या मुलांसमोर दुःख आणि दुःखच दिसत होते. शून्य नजरेत ही मुले अग्निकुंडाकडे पाहात होती. या अग्निकुंडात आपल्या आईबाबांना बघत होती. यावेळी आलेल्या नातेवाईक, मित्र परिवार यांच्यासह शासकीय अधिकारी, कर्मचारी यांनाही दुःख अनावर झाले होते. असा प्रसंग कुणाच्याही जीवनात नसावा अशी प्रार्थना करताना सर्व दिसत होते. सध्या ही कुटुंबे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार, चौक हद्दीतील डायमंड पेट्रोल पंप येथे कंटेनर हाऊसमध्ये राहात आहेत. लवकरच नवीन पुनर्वसन घरात राहण्यासाठी जातील, असे उपविभागीय अधिकारी अजित नैराळे यांनी सांगितले.

# यशवंत ठाकूर यांचा वाढदिवस उत्साहात



## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**। उरण । वार्ताहर ।**

शेतकरी कामगार पक्षाचे उरण तालुका सहचिटणीस यशवंत ठाकूर यांचा वाढदिवस बोकडवीरा शाळेमध्ये मोठ्या उत्साहात साजरा झाला. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या,पेन आदी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच अध्यक्षस्थानी कृष्णकुमार पाटील होते.

यावेळी कामगार नेते ॲड. संदीप पाटील, हेमलता पाटील, तारा पाटील, रामचंद्र पाटील, जयवंत तांडेल, रमेश ठाकूर, निकेतन ठाकूर, सरपंच अपर्णा पाटील, सविता पाटील, भारती पाटील, अश्विनी म्हात्रे, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चिकनी शाळेत वह्या वाटप

**। मुरुड । वार्ताहर ।**

तालुक्यातील काशिद ग्रामपंचायतीचे शेतकरी कामगार पक्षाचे सदस्य सरोज नथुराम पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत राजिपच्या चिकनी शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम गुरुवार, दि. १८ रोजी पार पडला. यावेळी संतोष मोरे, विशाल मोरे, राहुल च्याचे, प्रशांत खेडेकर, शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र साळावकर, जान्वी खेडेकर, सानिका दिवेकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी शाळेच्या वतीने मुख्याध्यापक साळावर यांनी सरोज पाटील यांचे आभार मानले.



# अल्पवयीन मुलाचे अपहरण

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल रेल्वे स्टेशन परिसरातून कोणी तरी अज्ञात इसमाने फूस लावून एका १७ वर्षीय मुलाचे अपहरण केल्याची घटना घडली आहे. या मुलाचे नाव समर शैलेश पोतनीस (१७, रा. शासकीय वसाहत, बांद्रा), रंग गोरा, उंची ५ फूट ६ इंच, बांधा सडपातळ, अंगात पिवळ्या रंगाचा टी-शर्ट व बिस्किट रंगाची फॉर्मल पॅन्ट घातलेली आहे. त्याला इंग्रजी, मराठी व हिंदी भाषा अवगत आहे. या मुलाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने पनवेल शहर पोलीस ठाणे ०२२-२७४५२३३३ किंवा पोलीस उपनिरीक्षक अंकुर शेलार ८८८८९३०७६८ येथे संपर्क साधावा.



# चौल दत्तमंदिरात गुरुपौर्णिमेचा उत्सव

## दत्तकृपा अन्नछत्र ट्रस्टकडून होणार प्रसादाचे वाटप

**। चौल । प्रतिनिधी ।**

चौल-भोवाळे येथील पर्वतनिवासी दत्त मंदिरात रविवारी (दि. २१) गुरुपौर्णिमेचा उत्सव उत्साहात साजरा केला जाणार आहे. यानिमित्त श्री दत्तकृपा अन्नछत्र ट्रस्ट, अलिबाग या संस्थेच्या माध्यमातून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन दत्त टेकडीवरील श्री स्वामी समर्थांच्या मठामध्ये करण्यात आले असून, येणाऱ्या भाविकांना प्रसाद आणि महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.



श्री दत्तकृपा अन्नछत्र ट्रस्ट, अलिबागचे संस्थापक अध्यक्ष महेश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी अन्नदान आणि प्रसादाच्या वाटपाचा कार्यक्रम होणार आहे. श्री. मोरे यांच्या नेतृत्वात आतापर्यंत ट्रस्टच्या माध्यमातून दत्तमंदिरात पायी पालखी परिक्रमा उत्सव, दर गुरुवारी अन्नदान, पंढरपूर, गाणगापूर, गोंदिवलेकर महाराजांच्या पावनभूमीत अन्नदान करण्यात आले आहे. ट्रस्टच्या माध्यमातून अन्नदानाचा घेतलेला वसा असाच अखंडित सुरु राहणार असल्याचे महेश मोरे यांनी सांगितले. दरम्यान, गुरुपौर्णिमेच्या दिवशी चौल दत्त टेकडीवरील श्री स्वामी समर्थांच्या मठात अन्नछत्र ट्रस्टच्या माध्यमातून रविवारी पहाटे पाच ते रात्रौ ११ वाजेपर्यंत प्रसादाचे वाटप करण्यात येणार असून, दुपारी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षी शेकडो भाविक या महाप्रसादाचा लाभ घेतात, अशी माहिती श्री. मोरे यांनी दिली. तरी, गुरुपौर्णिमेच्या दिवशीच्या कार्यक्रमात जास्तीत जास्त भाविकांनी प्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अन्नछत्र ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महेश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली ट्रस्टचे अध्यक्ष सागर कुंड व अन्य सदस्य मेहनत घेत आहेत.

पान १ वरून

## भूमीपूजन थाटात, रस्ता गटारात

त्यामुळे या गावासह आदिवासी वाडीतील मुलांच्या शिक्षणावर अडथळा निर्माण होतो. नोकरी-व्यवसायानिमित्त जाणाऱ्या नागरिकांचेदेखील प्रचंड हाल होतात. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था रायगडमार्फत काकलघर, चिंचघर ते सुरईतर्फे बोर्ली प्राथमिक आरोग्य केंद्र या पावणे पाच किलोमीटरच्या रस्त्यासाठी दोन कोटी ६५ लाख ९० हजार रुपयांचा निधीही मंजूर करण्यात आला. लोकसभा निवडणुकीच्या आधी या रस्त्याच्या कामाचे भूमीपूजन विद्यमान आमदार दळवी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. त्याचे फलकदेखील लावण्यात आले आहे. मोठा गाजावाजा करीत या रस्त्याच्या कामाचा भूमीपूजन सोहळा करण्यात आला. परंतु, अनेक महिने उलटून या रस्त्याच्या बांधकामात एक दगडही पडलेला नाही, त्यामुळे हा रस्ता केव्हा पूर्ण होणार, असा प्रश्न ग्रामस्थांचा आहे.

दरम्यान, सुरईकडे जाणारा मार्ग सुखकर होईल, अशी आशा सुरईकरांना वाटली होती. मात्र, आमदारांनी त्यांची घोर निराशा केली आहे. सदर रस्त्याची दुर्दशा झालेली असल्याने भागातील शाळकरी विद्यार्थी, शेतकरी व ग्रामस्थांना अजून किती दिवस यातना सोसाव्या लागणार आहेत, असा सवाल गावकरी विचारत आहेत. ३० डिसेंबर २०२३ या रस्त्याचे भूमीपूजन करण्यात आले. अजूनपर्यंत या रस्त्यावर साधी खडीदेखील टाकण्यात आली नाही. भूमीपूजन होऊन सहा महिने वीस दिवस होत पूर्ण झाले आहेत. तरीदेखील या रस्त्याचे काम सुरु झाले नसल्याने सुरईकरांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. अलिबाग तालुक्यातदेखील ग्रामसडक योजनेंतर्गत कामे आणून फक्त भूमीपूजन केल्याचा प्रकार अन्य ठिकाणीदेखील घडल्याची चर्चा सध्या सुरु आहे.

## अजित पवार गटाचा दर्जा घसरला

घेतली जाते. प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता देण्यासाठी १९६८ च्या निवडणूक आयोग पक्ष चिन्ह आणि पक्षाच्या नियमानुसार निकष ग्राह्य धरला जातो. लोकसभा निवडणुकीत दोन्ही पक्षांना मिळालेल्या मतांची आकडेवारी लक्षात घेऊन आयोगाने हा निर्णय घेतला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फूट पडण्याच्या अगोदर राष्ट्रीय पक्ष होता. फुटीनंतर पक्षाचे नाव आणि चिन्ह अजित पवारांना मिळाले, मात्र त्यांना राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळाला नाही. निवडणूक आयोगाने अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षालाही राज्यस्तरीय दर्जा दिला आहे. याचे कारणही लोकसभा निवडणुकीतील मतांची आकडेवारी आहे. दरम्यान, आम आदमी पक्षाला आता राष्ट्रीय पक्षाचा दर्जा देण्यात आला आहे.

## शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी शेकाप कटिबद्ध

प्रकल्पासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित झाल्या, त्यांना तत्कालीन लागू झालेल्या पुनर्वसन कायद्याप्रमाणे १७ वर्षांची नुकसानभरपाई मिळावी, प्रकल्पबाधित कुटुंबातील शैक्षणिक पात्रतेनुसार एका व्यक्तीस सातबाराप्रमाणे वारसा हक्काने कायमस्वरूपी नोकरी प्रकल्पात मिळावी, प्रकल्पबाधित असल्याचा दाखला प्रत्येक सातबाराधारकास मिळावा, प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना उच्चतम प्रमाणात जिल्ह्यातील विमानतळासाठी विकसित भूखंड दिला आहे, त्याप्रमाणे विकसित भूखंड मिळवा, प्रकल्पबाधित व्यक्ती, समूह किंवा सहकारी संस्था प्रकल्पात कंत्राटी व कामासंदर्भात प्राधान्य मिळावे, शेतकऱ्यांना कृषी मजुरी मिळावी याकरिता युवा ग्रामसुधार समिती धाकटे शहापूर तसेच पाच गावातील शेतकरी व भूमीपुत्रांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी यांना पत्रव्यवहार यापूर्वी केला होता, याबाबतची माहिती उपस्थितांनी चित्रलेखा पाटील यांना दिली.

न्याय्य हक्कासाठी शेतकरी संघर्ष समिती पेझारी व ग्राम सुधार समिती धाकटे शहापूर यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. सदरील केस बोर्डावर असून, पुढच्या आठवड्यात सुनावणीसाठी आहे. सदरील याचिकेत वरील सर्व मागण्यांचा ऊहापोह करण्यात आला आहे, तसेच न्यायालयाने निवृत्त न्यायाधीश व निवृत्त सनदी अधिकारी द्विस्तरीय लवाद नेमून वरील प्रश्नी त्वरित तोडगा काढावा, अशीही मागणी करण्यात आली आहे, तसेच लवकरच जिल्हाधिकारी यांच्या दालनात शेतकऱ्यांची संयुक्त बैठक आयोजित केली जाणार असल्याचे चित्रलेखा पाटील यांना सांगण्यात आले.

दुसऱ्या सत्राचे भूसंपादन करताना योग्य स्वरूपाचा भाव देण्यात यावा, सर्वे नंबर २० ते २०० या जागेत टाटा पॉवर प्रकल्प उभारण्यात येणार होता, याकरिता कवडीमोल भावाने शेतकऱ्यांच्या जमिनी विकत घेतल्या होत्या, पण तो प्रकल्प उभा राहिला नाही. शेतकऱ्यांना न्याय मिळवून शहापूर येथील रेडीरेकनर दर प्रतिएकर ४१,२०,०००/- या भावाच्या चौपट १,६४,८०,०००/- एवढा भाव भूमीसंपादन कायदा २०१३ प्रमाणे शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सर्व बाधित शेतकऱ्यांना मिळालाच पाहिजे, यासाठी आम्ही लढा देणार आहोत, असा निर्धार यावेळी उपस्थितांनी केला.

याप्रसंगी उपस्थित मान्यवर माजी पंचायत समिती सदस्य सुधीर थळे, गावकीचे अध्यक्ष निवृत्ती पाटील, ॲड. कुंदन पाटील, शहापूर ग्रामपंचायत माजी सरपंच राजेंद्र पाटील, अजित पाटील, शेतकरी संघर्ष समिती पेझारी सचिव अनिल पाटील, सुहास पाटील, उल्हास पाटील, नंदकुमार पाटील, नरेंद्र मोकल, ग्रा.पं. सदस्य अनिल म्हात्रे, मितेश पाटील, ज्येष्ठ ग्रामस्थांसह जवळपास ५५ शेतकरी उपस्थित होते.

**शेतकरी कामगार पक्षाचा जिल्ह्यातील प्रकल्पांना विरोध याआधीसुद्धा नव्हता आणि भविष्यातसुद्धा नसेल. पण, प्रकल्पबाधित आणि स्थानिक भूमीपुत्रांना नोकऱ्या आणि विकसित भूखंड मिळालाच पाहिजेत, हा आमचा अट्टाहास असेल. आमचा पक्ष शेतकऱ्यांच्या, स्थानिकांच्या पाठीशी सदैव उभा राहील आणि न्याय मिळवून देईल.**
**– चित्रलेखा पाटील, शेकाप महिला आघाडी प्रमुख**

## पेण शहर पाण्याखाली

महसूलच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरुन मनमानेल तसा भराव करुन बेकायदा बांधकामे आणि मोकळ्या जमिनीत झालेली वारेमाप झालेले भराव यामुळे पाणी निचऱ्याचे स्रोत बंद झाल्याने हा परिसर पाण्याखाली गेला आहे, असा आरोप पेणकरांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, या आरोपांचे प्रशासनाकडून खंडन करण्यात आले असून, उपाययोजना सुरू असल्याचे सांगण्यात आले.

पेण शहर हे सुनियोजित शहर नसून, ऐतिहासिक शहर असल्याने त्याच्या अंतर्गत असलेली गटार रचना अरुंद आहे. त्याचप्रमाणे भोगावती नदीच्या पात्रात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याने भोगावती नदीचे पात्रदेखील अरुंद झाले आहे. पेण शहराच्या उत्कर्ष नगर, दातार आळी, कोंबडपाडा, पिंपळडोह, जुन्या आरटीओ कार्यालयाच्या मागे असणाऱ्या वसाहतींमध्ये गेली दोन दिवस घरांमध्ये पाणी शिरत आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, जलसंपदा खात्याचा बेजबाबदारपणा. तसेच जी काही पेण शहराच्या आजूबाजूने भराव सुरु आहेत. त्यावर महसूल खात्याची लगाम नाही. भोगावती नदीच्या पात्रातदेखील तोच प्रकार सुरू आहे. याचा सर्वस्वी फटका पेण नगरपालिका प्रशासनाला बसत आहे. गेली दोन दिवस पेण नगरपालिका आपत्कालीन व्यवस्थेच्या सहाय्याने पाण्याचा निचरा कसा होईल याकडे लक्ष देत आहेत. परंतु, त्यांच्या प्रयत्नाला यश येत नाही. त्यातच काही लोकप्रतिनिधीदेखील मनमानी करुन नैसर्गिक पाण्याच्या निचऱ्याचे स्रोत बंद करु पाहात आहेत. काल उत्कर्ष नगरमध्ये जे काही घरांमध्ये पाणी शिरले त्यामागचे मोठे कारण हे होते की, एका माजी उपनगराध्यक्षाने स्वतःच्या जागेत भराव करुन नैसर्गिक निचरा होण्याचा पाण्याचा स्रोत बंद केला होता. मात्र, ही बाब आमच्या प्रतिनिधीच्या लक्षात येताच त्याने मुख्याधिकारी जीवन पाटील यांच्याशी संपर्क साधला. मुख्याधिकाऱ्यांनी तातडीने पाण्याचा मार्ग मोकळा करण्याच्या सूचना केल्या. त्यावेळेला नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी जेसीबी लावून पाण्याचा रस्ता मोकळा केल्याने सर्वसामान्यांच्या घरातील पाणी खाली झाले. अन्यथा त्यांना रात्री घरात झोपणेही कठीण झाले असते. हे एकच उदाहरण नसून, पेण शहराच्या बाजूने मोठ्या प्रमाणात अशाच प्रकारचे भराव झालेले आहेत. नगरपालिका प्रशासनाने ठरविले तरी पाणी निचऱ्याचे मार्ग मोकळे करणे कठीणच आहे.

**पेण शहराच्या पूर्व भागात गेली दोन दिवस पाणी आहे हे मान्य आहे. परंतु, नालेसफाई झाली नाही, हे बोलणे चुकीचे आहे. कारण, मे महिन्याच्या २५ तारखेच्या अगोदरच नालेसफाई झाली होती. परंतु, पेण शहाराच्या आजूबाजूने मोठ्या प्रमाणात भराव झाल्याने पाण्याचा निचरा ज्या प्रमाणात व्हायला हवा, त्याप्रमाणे होत नाही. असे असतानादेखील नगरपालिकेची पूर्ण टीम नागरिकांना त्रास होणार नाही यासाठी मेहनत घेत आहे.**
**– जीवन पाटील, मुख्याधिकारी**

## तालुक्यात शिक्षणाचा बोजवारा

अधिकारी नाही आणि अकरा केंद्रात एकही रेग्युलर केंद्रप्रमुख नाही, ही म्हसळा तालुका शिक्षण विभागाची खरी शोकांतिका आहे. २०१५ पासून गटशिक्षणाधिकारी पद रिक्त आहे.

शिक्षण विभागाचा कारभार आजदेखील बेवारस आहे. कारण, ज्या केंद्रामध्ये रिक्त पद आहे, त्या केंद्रामध्ये तालुक्यातील हौशी दांडी मास्तर जे अधिकाऱ्यांचे असणारे लाड पुरवतात, त्यांना प्रभारी केंद्रप्रमुख पद बहाल केले आहे, अशी चर्चा आहे. त्यातील काही प्रभारी केंद्रप्रमुख हे जीवतोड प्रामाणिकपणे काम करतात, तर काही केंद्रप्रमुख आपल्याला भेटलेल्या पदाचा वापर केंद्रप्रमुखाच्या नावावरती शिमगा उत्सव करत असल्याचे संकेत तालुक्यात वर्तवले जात आहे. आपली शाळा रंगरंगोटी करून बाह्य रूपाने चकाचक करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व शैक्षणिक दर्जा याकडे लक्ष न देता आपली शाळा कशी प्रगत होईल असे आव आणणारे काही मोजके शिक्षक आजही तालुक्यामध्ये बिनधास्तपणे संबंधित अधिकाऱ्यांच्या वरदहस्तामुळे वावरत आहेत. या साऱ्या गोष्टींवरती लक्ष ठेवणारे गटशिक्षण अधिकारी, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी हेच जर नसतील, तर म्हसळा तालुका शिक्षणाच्या मूळ प्रवाहातून वेगळा झाल्याची चर्चा शिक्षण तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे. जिल्ह्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना या व्यथा माहीत असूनही जाणूनबुजून दुर्लक्ष होत आहे. एकाच केंद्रातील दोन-दोन शिक्षकांना त्यांच्या मूळ शाळेवरून काढून केंद्रप्रमुखपदी नेमणूक करून विद्यार्थ्यांचे वाटोळे करण्याचा हा प्रयत्न आहे की काय, अशी चर्चा सर्वसामान्य पालकांकडून ऐकावयास मिळते. तालुक्यातील शिक्षण विभागाची दुरवस्था दर्शविणारी आकडेवारी खालीलप्रमाणे असून केवळ प्रशासन, लोकप्रतिनिधी यांच्यामुळे खासगी शाळांकडे विद्यार्थी पाठविण्याची वेळ सर्वसामान्य पालकांवर आली आहे.

एकूण २२ मंजूर पदांपैकी पैकी सर्वच्या सर्व पदे रिक्त आहेत. हा म्हसळा तालुक्याच्या शिक्षण विभागाच्या प्रगतीचा उतरता आलेख आहे.

## कुंभे परिसरालाही १४४ कलमाचे लॉक

रवाळजे दूरक्षेत्र अंतर्गत, मौजे भिरा गावचे हद्दीतील देवकुंड धबधबा व सणसवाडी गावचे हद्दीतील सिक्रेट पॉईंट व ताम्हाणी घाट येथे १४४ कलम लागू करण्याबाबत प्रस्ताव सादर केला आहे. सदरचा परिसर पावसाळी हंगामात पुणे-मुंबई व महाराष्ट्रातील पर्यटकांचे आकर्षणाचे ठिकाण आहे. ही ठिकाणे नैसर्गिक दुर्गम भागात असल्यामुळे तेथे कोणत्याही सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. सन २०१७ चे पावसाळी हंगामात सदर ठिकाणी भेट दिलेल्या पर्यटकांमधील ४ पर्यटक हे नदीच्या प्रवाहात वाहत जाऊन मृत्युमुखी पडले होते. तसेच सुमारे ५५ पर्यटक हे अचानक पाण्याचा जोर वाढल्याने नदीचे पात्राचे ठिकाणी अडकले होते. सन २०१८ चे पावसाळी हंगामातदेखील फौजदारी प्रक्रिया, संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये मनाई आदेशाची मुदत संपल्यानंतर ३ पर्यटक हे नदीच्या प्रवाहात वाहून गेले होते व मृत्युमुखी पडले होते.

सन २०२२ मध्ये एक पर्यटक नदीच्या पाण्याचा प्रवाह अचानक वाढल्याने पाण्यात वाहून जाऊन मयत झालेला आहे. त्याचबरोबर सिक्रेट पॉईंट या ठिकाणी सुरक्षा व्यवस्थेचा अभाव असल्याने पर्यटकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते व ताम्हीणी घाट हा धोकादायक वळणांचा व तीव्र उताराचा असल्याने तसेच दरड कोसळण्याचा संभव असल्याने पर्यटकांची वित्त व जिवीत हानी होऊ शकते. या कारणांमुळे देवकुंड धबधबा, सिक्रेट पॉईंट व ताम्हाणी घाट ही पर्यटन स्थळे पर्यटकांच्या दृष्टीने सुरक्षित नसल्याने या ठिकाणी कलम १४४ लागू केला आहे.

# वनविभागाच्या जागेवर अनधिकृत मजार

## रसायनीकरांचा उग्र आंदोलनाचा इशारा

**। रसायनी । वार्ताहर ।**

रसायनी जुनी पोसरी येथील वन विभागाच्या जागेवर झालेल्या अनधिकृत मजार बांधकाम अतिक्रमणावर कारवाई करण्यात यावी अन्यथा उग्र आंदोलन करण्याचाइशारारसायनीतीलपोसरी, सावळे, देवळोली ग्रामपंचायत, बजरंग दल तसेच परिसरातील आसपासच्या ग्रामपंचायतींनी वनविभागाला दिला आहे. दरम्यान, रसायनीकरांत याप्रकरणी संतापाची लाट उसळल्याचे चित्र पहावयास आहे. या अनधिकृत बांधकामाकडे वनविभाग जाणूनबुजून दुर्लक्ष करीत असल्याची चर्चा नागरिकांत आहे.



याबाबत स्थानिक ग्रामपंचायतींनी पत्रव्यवहार केला; परंतु वनविभाग जाणूनबुजून कानाडोळा करत असल्याने बजरंग दलाने ही पाठिंबा देत विषय हाताळला आहे. यासाठी बजरंग दलाच्या शिष्टमंडळाने जुनी पोसरी येथील बांधकाम न तोडल्यास वनविभागाच्या कार्यालयासमोर ठिय्या आंदोलनाचा इशारा दिला आहे. तर हिंदू संघटनाही आंदोलनाच्या पावित्र्यात आहेत. याअगोदर बजरंग दलाच्या शिष्टमंडळाला सदर बांधकाम तोडण्यात येणार असल्याचा शब्द वनविभागाचे पनवेल आरएफओ यांनी दिला असतानाही टाईमपास केला जात आहे. याबाबत बजरंग दलाने पंतप्रधान कार्यालय, मुख्यमंत्री, गृहमंत्री, वनमंत्री, तहसीलदार, वनविभाग अलिबाग, ठाणे, पनवेलसह स्थानिक पोलीस यांच्याशी पत्रव्यवहार केला आहे.

# डॉक्टरांची पंढरपूर येथे मोफत सेवा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेलमधील पनवेल डॉक्टर्स जनरल प्रॅक्टिशनर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. वैभव मोकल, सचिव डॉ. विवेक महाजन, खजिनदार डॉ. संदेश बहाडकर, वरिष्ठ डॉ. मिलिंद टिपणीस यांच्या मार्गदर्शनाखाली साधारणपणे ४० महिला आणि पुरुष डॉक्टरांनी दि. १७ जुलै रोजी आषाढी एकादशीनिमित्त पायी वारी करणाऱ्या वारकऱ्यांची वारकरी भवन (गोपाळपूर) पंढरपूर येथे मोफत रुग्ण तपासणी आणि मोफत औषधांचे वाटप केले. या शिबिराचा लाभ १०७२ महिला आणि पुरुष वारकऱ्यांनी घेतला.



पनवेलमधून दि. १६ जुलै रोजी निघालेल्या या सर्व डॉक्टरांची राहण्याची व्यवस्था अकलूज येथे डॉ. विवेक देवकाते यांनी केली. पनवेल डॉक्टर जनरल प्रॅक्टिशनर असोसिएशनच्या या स्तुत्य उपक्रमाला शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार बाळाराम पाटील, पनवेलचे माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, पनवेल विधानसभा अध्यक्ष काशिनाथ पाटील, पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण घरत, माजी सभापती डॉ. दत्तात्रय पाटील आदींनी भेट देऊन रुग्णांची चौकशी केली आणि डॉक्टरांच्या या चांगल्या उपक्रमाचे कौतुक केले. या मोफत आरोग्य शिबिरासाठी पनवेल ते पंढरपूर दिंडीचे अध्यक्ष गणेश महाराज आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे सहकार्य मिळाले.

# गोरक्षकांना मारहाण

**। पनवेल । वार्ताहर ।**

तळोजा येथे गोवंश सोडवण्यासाठी गेलेल्या गोरक्षकांवर पोलिसांसमोरच मारहाण करण्याची घटना घडली आहे. या घटनेमध्ये गोरक्ष कैलास रेपाळे, विशाल बिंद, प्रतिक ननावरे, तेजस पाटील यांच्यावर हल्ला कण्यात आल्याने यात काही जण जखमी झाले आहेत. याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यामध्ये सलमान सजीर पटेल, सफवान सजीर पटेल, अत्ताउल्ला ईस्माईल खानसह सात जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी कैलास रेपाळे यांनी पोलिसात तक्रार दिली आहे.

# इनरव्हील क्लबचे कौतुकास्पद कार्य



**। पनवेल । वार्ताहर ।**

समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात अग्रगण्य असलेल्या पनवेल येथील इनरव्हील क्लब ऑफ पनवेल या संस्थेच्या अध्यक्षा डॉ. वीणा मनोहर यांनी विविध सामाजिक उपक्रम राबवून मोठ्या उत्साहाने यावर्षीच्या प्रकल्पांना सुरुवात केली आहे. त्या अनुषंगाने बौद्धिक अक्षम विशेष मुलांसोबत आषाढी एकादशी, वृद्धाश्रमाला अन्नधान्य, रात्रशाळेच्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे संच, विद्यार्थ्यांना सायकल, वैद्यकीय तज्ज्ञांचा सत्कार आदी उपक्रम राबवून कौतुकास्पद कार्य केले आहे. इनरव्हीलच्या माध्यमातून गरीब विद्यार्थ्यांना ११ सायकलींचे वाटप करण्यात आले. ही मदत विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अमूल्य आहे, असे उद्‌गार रात्र शाळेचे मुख्याध्यापक संतोष पवार यांनी काढले.

**निवडक**

## पावसाचा जोर कायम

**तळा :** तळा तालुक्यात सलग तिसऱ्या दिवशी पावसाचा जोर कायम राहिला आहे. सकाळपासून पावसाने मुसळधार सुरुवात करीत तळा तालुक्याला झोडपले. यामुळे तालुक्यातील नद्या, नाले, विहिरी, धबधबे तुडुंब भरून वाहत आहेत. शेतीची कामांना तालुक्यात वेग आला आहे. पावसाचा जोर असाच कायम राहिल्यास तालुक्यातील नद्यांना पूर येऊन गावांचा संपर्क तुटण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

## प्रमोद अनमाने यांचा सन्मान

**सोगाव :** राज्य परिवहन महामंडळाच्या अंतर्गत परीक्षा नुकत्याच घेण्यात आल्या होत्या. त्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. यामध्ये अलिबाग आगारातील चालक प्रमोद अनमाने हे गेली अनेक वर्षे चालक पदावर कार्यरत आहेत. त्यांनी आजतागायत विना अपघात सेवा केली आहे. याबाबत त्यांचा राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांतर्फे जाहीर सत्कार करण्यात आला होता.चालक प्रमोद अनमाने यांना अंतर्गत परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल मुनवली ग्रामस्थांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन शुभेच्छा दिल्या.

## शैक्षणिक साहित्याचे वाटप

**नेरळ :** कर्जत तालुक्यात दुर्बल घटकांसाठी सामाजिक कार्य करणाऱ्या रहमान फाऊंडेशनच्या वतीने कळंब येथील प्रगती माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. रहमान फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष हजरत सज्जाद नोमानी यांच्या माध्यमातून अंध अपंग संस्था वारे यांच्या सहयोगाने प्रगती माध्यमिक विद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प्रगती विद्यालयातील सुमारे १७० विद्यार्थ्यांना १००० वह्यांचे वाटप केले.

## पांडुरंग मालुसरे यांचे निधन

**खांब :** रोहा तालुक्यातील कृषीनिष्ठ बाहे गावातील कृषीनिष्ठ शेतकरी पांडुरंग रामचंद्र मालुसरे यांचे राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांनी आपल्या हयातीत शेती व्यवसाय सांभाळून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह केला.त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक सुन, नातवंडे असा परिवार असून त्यांचे दशक्रियाविधी २३ जुलै रोजी तर अंतिम धार्मिकविधी २६ जुलै रोजी राहत्या निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

## किशोरवयीन मुलांसाठी समुपदेशन

**खांब :** दीपक फाऊंडेशन रोहा व जिल्हा रूग्णालय अलिबाग यांच्या वतीने नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे येथे किशोरवयीन मुलांसाठी समुपदेशन व जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. समुपदेशन व समन्वयक डॉ.अपर्णा करंदीकर, वरिष्ठ प्रकल्प समन्वयक अजय आवाडे, डॉ.प्रियंका नरवणकर, समुपदेशक अक्षरा जाधव, अश्विनी ऐत, सेजल घोरपडे, मारूती निगडे, मुख्याध्यापक दिपक जगताप आदी उपस्थित होते.

### वाड्यांच्या रस्त्यासाठी आदिवासी बांधव आक्रमक

# माथेरान घाट रोखणार






**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील माथेरानचे डोंगरात असलेल्या आदिवासी वाड्यांना जाणारा रस्ता वन विभागाच्या अडथळ्यामुळे होत नाही. रस्ता नसल्याने या भागातील आसलवाडी येथील महिला विठाबाई विठ्ठल सांबरी यांचा सर्प दंशाने मृत्यू झाला. त्यानंतर शासनाच्या भूमिकेबद्दल आदिवासी समाजात सापत्नपणाची भावना व्यक्त होत आहे. दरम्यान, शासनाने जुम्मापट्टी पासून किरवली वाडीपर्यंत रस्ता तयार करावा या मागणीसाठी आदिवासी बांधव रस्ता रोको करणार असून २९ जुलै रोजी नेरळ माथेरान घाटरस्ता रोखण्याचा इशारा दिला आहे.

माथेरान डोंगर रांगेत असलेल्या १३ आदिवासी वाड्या आजही रस्त्यापासून दूर आहेत. स्थानिक आदिवासी रस्त्यासाठी दरवर्षी श्रमदान करतात आणि आपली पायवाट स्वतःच बनवतात. त्यात सर्वाधिक १३ आदिवासी वाड्या या नेरळ माथेरान घाट रस्त्यातून सुरू होणाऱ्या डोंगर रांगेतील आहेत. येथील जुम्मापट्टी येथून सुरू होणाऱ्या आदिवासी वाड्यांचा पट्टा हा कर्जत शहराजवळील किरवली ग्रामपंचायत हद्दीत राहणाऱ्या आदिवासी बांधवांना देखील पक्का रस्ता मिळाला नाही. या पट्ट्यातील १२ आदिवासी वाड्या या साधारण साडे तेरा किलोमीटर अंतरामध्ये असून या मार्गात रस्ता बनविणे अत्यंत सोपे काम आहे. वन जमिनीवर वस्ती करून राहत असलेले हे आदिवासी बांधव वन जमिनीवर २०० वर्षे घरे बांधून राहत असून देखील रस्त्यापासून वंचित आहेत.

माथेरानचे डोंगरातील पाणी या भागातून वाहत जात असल्याने या भागात वन विभागाची हरकत दूर झाली तर दोन वर्षात सर्व सोयींनी युक्त असा रस्ता तयार होऊ शकतो. जमीन वन विभागाची आहे मात्र त्या जमिनीवर झाडे फार अत्यल्प आहेत. केवळ जागा अडवयाची म्हणून वन विभाग आपली हुकूमत येथील आदिवासी बांधवांवर दाखवत असल्याचा आरोप आदिवासी नेत्यांनी केला आहे.

वन विभागाची दळी जमीन असल्याने शासनाने कोणत्याही प्रकारचे वनीकरण केले जात असलेल्या या जमिनीवर रस्ते करून देण्याची परवानगी शासन का देत नाही? असा प्रश्न आदिवासी सतत विचारत असतात.

कर्जत तालुक्यातील माथेरानचे डोंगरामध्ये असलेल्या आदिवासी वाड्या या चार ग्रामपंचायतींमधील वाड्या आहेत. त्यात माणगाव तर्फे वरेडी ग्रामपंचायतीमध्ये बेकरेवाडी तसेच जुम्मापट्टी धनगर वाड्यांचा समावेश आहे. तर आसल ग्रामपंचायतीमध्ये आसलवाडी, बोरीचीवाडी, मना धनगर वाडा, धामणदांड, सागाची वाडी, चिंचवाडी, सागाची वाडी, भूतीवली वाडी, पाली धनगर वाडा, नाण्याचा माळ यांचा समावेश आहे. उमरोली ग्रामपंचायतीमध्ये आषणेवाडी आणि किरवली ग्रामपंचायतीमध्ये सावरगाव वाडी आणि किरवली वाडी यांचा समावेश आहे.त्या रस्त्यावर चार ठिकाणी मोठे नाले असल्याने मोठे पूल आणि १५-२० ठिकाणी साकव बनवून ग्रामस्थांच्या रस्त्याचा प्रश्न निकाली निघू शकतो. त्यात अडथळा ठरत असलेल्या वन जागेचा विषय वनीकरण केले जात असल्याने निकाली निघू शकतो. मात्र शासनाची आणि लोकप्रतिनिधी यांची मानसिकता नसल्याचे दिसून येत आहे.

शासन माथेरान डोंगरातील जुम्मापट्टी ते किरवली वाडी या भागातील रस्ता तयार करीत नसल्याने आसल वाडीमधील आदिवासी महिला विठाबाई विठ्ठल सांबरी यांचे सर्प दंशाने मृत्यू झाला आहे. त्या भागात आसलवाडी ते बेकरेवाडीपर्यंत रस्ता नसल्याने त्या महिलेला स्थानिक आदिवासी लोकांनी कपड्याची झोळी करून त्यानं वाहून आणण्यात आले. वेळेत रुग्णालयात नेवून उपचार झाले नाहीत आणि त्यामुळे विठाबाई सांबरी यांचे निधन झाले होते. त्यामुळे शासनाच्या विरुद्ध नेरळ माथेरान घाटरस्ता २९ जुलै रोजी रोखला जाणार आहे. तसे लेखी पत्र जैतू पारधी आणि गणेश पारधी यांनी कर्जत तहसीलदार यांना दिलेल्या पत्रात इशारा दिला आहे.



## अतिवृष्टीमुळे केळघर रस्ता गेला खड्ड्यात


### वाहनचालकांची होतेयं कसरत

**। कोर्लई। वार्ताहर ।**

नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे मुरूड व रोहा तालुक्याला जोडणाऱ्या रस्त्यावर गारंबी - केळघर दरम्यान खड्डे पडले आहेत. काही ठिकाणी रस्ते वाहून, मोऱ्या खचून दैना उडाली असून उखडलेल्या रस्त्यामुळे येथून जाणाऱ्या वाहनचालकांना वाहन चालविण्यासाठॅ कसरत करावी लागत आहे. गेले कित्येक वर्षे हा रस्ता होत नसल्याने याकडे संबंधित बांधकाम खात्याच्या दुर्लक्षाबाबत नाराजी व्यक्त केली जात आहे.

गारंबी पावसाळी पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे. या ठिकाणी शनिवारी, रविवार विकेंडसाठी तसेच सुट्टीच्या दिवशी पर्यटकांची रेलचेल असते. मुरूड-जंजिरा पर्यटनासाठी मुंबई, पुणे येथील पर्यटकांना केळघर मार्गे मुरुडला येणे सोयीचे असल्याने या मार्गावर वर्दळ वाढली आहे. स्थानिकांनादेखील या मार्गाने प्रवास सोयीस्कर होत आहे. परंतु या मार्गावर अरुंद रस्ते, वळणं व घाट रस्ता आहे. त्यामुळे वाहन चालकांना सावधगिरी बाळगावी लागते. या मुरूड -गारंबी -केळघर रस्त्यावरील खड्डे, ठिकठिकाणी खचलेल्या मोऱ्या असल्याने वाहन चालविणे धोकादायक बनले असून वेळप्रसंगी अपघाताची शक्यता लक्षात घेऊन शासनाच्या संबंधित बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी यात लक्ष पुरवून लवकरात लवकर रस्त्यावरील खड्डे बुजविण्यात यावेत. अशी मागणी जोर धरीत आहे.

## पर्यटकांची जान ‘अश्व माथेरान’



### पावसात पर्यटक घेत आहेत घोडेस्वारीचा आनंद

**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरान पर्यटनस्थळाला निसर्गाने भरभरून दिले आहे. येथील सुंदर निसर्गाबरोबरच या पर्यटनस्थळी घोडेस्वारी हे येथील प्रमुख आकर्षण आहे. पावसाळ्यात याठिकाणी वर्षा पर्यटनासाठी येथे येणारे असंख्य पर्यटक या मुसळधार पावसातदेखील घोडेस्वारीचा मनमुराद आनंद घेताना दिसत आहेत.

जागतिक दर्जाचे सुप्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या माथेरानला पावसाळी वर्षा पर्यटन हे खूप जोमात सुरू आहे. दररोज हजारोंच्या संख्येने पर्यटक माथेरानमध्ये दाखल होताना दिसत आहेत. माथेरान शहरात येणारे बहुसंख्य पर्यटक हे येथील आल्हाददायक नयनरम्य निसर्गाबरोबरच माथेरानची शान समजल्या जाणाऱ्या अश्वाच्या म्हणजेच घोडेस्वारीच्या प्रेमात येथे पडलेले दिसतात.

घोडेस्वारी हा येथील मुख्य व्यवसायदेखील आहे. माथेरानच्या लाल मातीतून आंतराष्ट्रीय दर्जाचे अनेक घोडेस्वार तयार झाले आहेत. पर्यटकदेखील आपल्या मुलांना उत्तम घोडेस्वारीचे प्रशिक्षण देण्यासाठी आणि त्यांना चांगल्या दर्जाचा घोडेस्वार बनविण्यासाठी येथे येत असतात. मुंबईस्थित असलेल्या अनेक अश्वप्रेमींचे अश्वदेखील माथेरानमध्ये सांभाळण्यासाठी असतात.

माथेरान युथ सोशल क्लबच्या वतीने गेली अनेक वर्ष माथेरानच्या वीर हुतात्मा क्रीडा संकुलात अश्वशर्यती आयोजित केल्या जातात. सुंदर पर्यटनस्थळी दाखल होण्यासाठी अनेक पर्याय उपलब्ध झाले असले तरी माथेरानमध्ये दाखल झाल्यावर घोडेस्वारीचा मोह मात्र पर्यटकांना आवरता येत नाही. तरुणानं सोबतच येथे आबालवृद्ध पर्यटक घोडेस्वारीचा मनमुराद आनंद लुटताना दिसत आहेत.

## कृषी विभागाकडून भात लागवड सुधारीत पद्धतीची प्रात्यक्षिके





**। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।**

मुरूड तालुक्यात भात लागवडीच्या पारंपारिक पद्धती ऐवजी शेतकऱ्यांनी चारसुत्री पध्दत, पट्टा पद्धत व यंत्राच्या सहाय्याने भात लागवड या आधुनिक पद्धतीने भात लागवड करण्यासाठी सुधारीत पद्धतींची प्रात्याक्षिके शेतकऱ्यांच्या शेतावर प्रत्यक्ष घेवून कृषी विभागाकडून विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.

प्रात्यक्षिकासाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान व आत्मा योजनेंतर्गत वीस हेक्टर क्षेत्रासाठी कर्जत९ व रत्नागिरी ६ या सुधारीत वाणांच्या बियाण्यांचे शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले आहे. तालुक्यामधे ठिकठिकाणी कृषी सहाय्यकांमार्फत चारसूत्री पध्दतीने लागवडीची प्रात्यिक्षके घेण्यात येत आहेत. तसेच चोरढे येथे शंकर चोरढेकर या प्रगतशील शेतकऱ्याच्या शेतावर भात लावणी यंत्राच्या सहाय्याने भात लागवडीचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. त्यासाठी रोहा तालुक्यात भात लावणी यंत्र भाडयाने घेतले होते. या वेळी तालुका कृषी अधिकारी मनिषा भुजबळ , कृषी सहाय्यक विशाल चौधरी, आदिराज चौलकर, अतुल उपाध्ये , नथुराम रोहेकर, मनोज कदम व प्रगतशील शेतकरी सुनील घाग व इतर शेतकरी उपस्थित होते.

यंत्राच्या सहाय्याने भात लागवड करण्यासाठी एकरी फक्त ८ किलो बियाणे पुरेसे होते म्हणजेच पारंपारिक पद्धतीपेक्षा ५०टक्केच बियाणे लागते. तसेच रोपांमधील अंतर नियंत्रित होत असल्याने फुटवे चांगल्या प्रमाणात मिळतात, मजूरी वाचते, एक एकरवरील क्षेत्राची अवघ्या २/३ तासामध्ये लागवड पूर्ण होते.

मजूरांच्या कमतरतेसाठी यांत्रिकीकरण हा खूप चांगला पर्याय आहे शिवाय भात लागवड यंत्र खरेदीसाठी महाडीबीटी पोर्टलवर यांत्रिकीकरण योजनेंतर्गत ५०% अनुदान आहे. तसेच लागवडीच्या काळात सदर यंत्र भाड्याने देऊन शेतकरी चांगल्या प्रकारे उत्पन्न मिळवू शकतात. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांना यांत्रिकीकरणाकडे वळले पाहिजे असे आवाहन तालुका कृषी अधिकारी मनिषा भुजबळ यांनी केले.

## पी. एन.पी.महाविद्यालयात ॲडम स्मिथ स्मरण दिन साजरा



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागा अंतर्गत गुरुवारी अर्थशास्त्राचे जनक ॲडम स्मिथ यांचा स्मरण दिन साजरा करण्यात आला. १७ जुलै १७९० रोजी ॲडम स्मिथ यांचा मृत्यू झाला. या दिनाचे औचित्य साधून अर्थशास्त्र विभागांतर्गत विद्यार्थ्यांना ॲडम स्मिथ यांचे अर्थशास्त्रातील योगदान आणि त्यांचे चरित्र उलगडून दाखविण्यासाठी अर्थशास्त्र विभागाने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रसिका म्हात्रे यांनी आपल्या प्रस्तावनेत ॲडम स्मिथ यांचे अर्थशास्त्रातील योगदान स्पष्ट केले तर या विभागातील विद्यार्थी श्रेया शेळके, श्रुती घरत, जयेश पाटील यांनी ॲडम स्मिथ यांचे बालपण, शिक्षण आणि ‘वेल्थ ऑफ नेशन्स’ हे ॲडम स्मिथ यांच्या गाजलेल्या पुस्तकावर प्रकाश टाकला. महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. ओमकार पोटे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र यांमधील परस्पर संबंध स्पष्ट केला तर कला विभाग प्रमुख डॉ. नम्रता पाटील यांनी दैनंदिन जीवनातील अर्थशास्त्र आणि नैतिकता यावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. सदर कार्यक्रमासाठी वृषाली घरत आणि विद्यार्थी वर्ग उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. रसिका म्हात्रे यांनी केले.

## माजी आमदार मधुकर ठाकूर यांना अभिवादन



**। सोगाव । वार्ताहर ।**

माजी आमदार मधुकर ठाकूर यांच्या जयंती व तृतीय स्मृती दिनानिमित्त सातिर्जे येथील स्मृती स्थळावर अनेक मान्यवरांनी व कार्यकर्त्यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी माजी आमदार मधूशेठ ठाकूर यांनी केलेल्या राजकीय व सामाजिक कार्यांचा तसेच गोरगरिबांच्या केलेल्या सेवांबाबत त्यांच्या आठवणींना अनेक उपस्थित मान्यवरांनी भावुक होत उजाळा दिला.

त्यांच्या अलिबाग तालुक्यातील मूळगावी सातीर्जे येथील स्मृतिस्थळावर आवर्जून अभिवादन करण्यासाठी चोंढी येथील ज्येष्ठ समाजसेवक सुधीर उर्फ बाळू गायकवाड, अलिबाग नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, तुषार पाटील, जगे गॅस एजन्सीचे कैलास जगे, संतोष पेडणेकर, विलास पाटील, ॲड. कौस्तुभ पुनकर, कैलास गजणे, किहीम सरपंच प्रसाद उर्फ पिंट्या गायकवाड, डॉ. किरण शेटे, माजी जिल्हा परिषद सदस्य काका ठाकूर, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षाचे सचिव प्रविण ठाकूर, रायगड जिल्हा काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ उपाध्यक्ष राजाभाऊ ठाकूर, शिवसेना नेते आमिर उर्फ पिंट्या ठाकूर, सातिर्जे ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच प्राची ठाकूर, सातीर्जे उपसरपंच उमेश ठाकूर, समीर ठाकूर, रवींद्र ठाकूर आदी उपस्थित होते.

### पोलादपूरात शेतकऱ्यांना संततधारेचा दिलासा

# आषाढी एकादशीनंतर पुन्हा शेतामध्ये लावणीची लगबग





**। पोलादपूर। वार्ताहर।**

तालुक्यातील शेतकरी बहुसंख्येने वारकरी असल्याने आषाढी एकादशीची पंढरपूरवारी करून श्रीविठ्ठलाचे दर्शन घेऊन परतल्यानंतर आज संततधारेचा दिलासा मिळाल्याने पुन्हा शेतकऱ्यांनी उर्वरित लावणीच्या कामाला नव्या जोमाने सुरूवात केली आहे.

येत्या रविवारपासून गुरूपौर्णिमेच्या दिवसापासून आपआपल्या फड व संस्थानाच्या गुरूवर्यांचे दर्शन घेण्याची ओढ लागल्याने शेतकरी कुटूंब शुक्रवार व शनिवारी लावणीची कामे पूर्ण करण्यासाठी एकमेकांना सहकार्य करू लागले आहेत.

पोलादपूर या वारकरीबहुल तालुक्यातील बहुसंख्य शेतकऱ्यांची पंढरपूरची वारी शेतीच्या कामावेळी आल्याने श्रीविठ्ठलाच्या दर्शनाची ओढ लागलेल्या शेतकऱ्यांनी लावणीच्या कामात थोडीफार दिरंगाई करीत यंदाची वारी पूर्ण केली. सोमवारी शेतातून परतल्यानंतर मंगळवारी पंढरपूरला रवाना होऊन बुधवारी श्रीविठ्ठलाचे दर्शन घेत यंदाची वारी पूर्ण केल्याचे समाधान मिळवित वारकऱ्यांनी गुरूवारी एकमेकांचे पाय धरून पुण्याचे वाटप केले.

बुधवारी पंढरपूर सोडायचे नसल्याने अनेकांनी गुरूवारी आषाढी एकादशीचा उपवास सोडताना प्रस्थान केले आणि घर गाठले. यादिवशी गावामध्ये अन्य वारकऱ्यांनी श्रीविठ्ठलाचे दर्शन लाभलेल्या वारकऱ्यांचे पाय धरून दर्शन घेतले.

शुक्रवारी दुपारपासून पावसाची संततधार सुरू असल्याने पोलादपूर तालुक्यातील शेतकरी कुटुंबांनी वारीच्या प्रवासाचा थकवा बाजूला सारून एकमेकांच्या शेतामध्ये आवणं रोवायला हातभार लावायला सुरूवात केल्याचे सार्वत्रिक दृश्य दिसून आले. या दरम्यान कोणाच्या मुखी अभंगाची एकतरी ओवी मोठया आवाजात लकेर घेऊन गायली जात होती तर अनेकांची या लकेरीला साथ म्हणून समूहगायनसदृश्य ओवीला प्रतिसाद दिला जात असल्याचे शेतातील मातीमध्ये भातलावणीदरम्यान सार्वत्रिक दृश्य दिसून येत होते.

शुक्रवार आणि शनिवारी भातलावणीसाठी खलाटीमध्ये उतरणाऱ्या शेतकऱ्यांच्या कुटूंबियांना रविवारपासून आपआपल्या सांप्रदायांच्या गुरूंचे गुरूपौर्णिमेनिमित्त दर्शन घेण्यासाठी सर्व वारकरी मंडळींना पुन्हा ओढ लागणार असल्याने दोन दिवसांमध्ये लावणीचे काम उरकण्यासाठी अपूर्ण काम राहिलेल्या शेतकऱ्यांना सहकार्य करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी शेतकरी बांधवांनी दिली.

## कोलाड नाक्यावरील खड्ड्यांनी नागरिक हैराण

**। सुतारवाडी । वार्ताहर ।**

कोलाड नाक्यावर ज्या ठिकाणी उड्डाणपूल होणार आहे अशा ठिकाणी पुलाच्या दुतर्फा अनेक खड्ड्यांनी आपले साम्राज्य उभे केले असल्याचे दृश्य सध्या पाहावयास मिळत आहे. सध्या मोठ्या प्रमाणावर पाऊस पडत असून येथील खड्ड्यांनी उग्ररूप धारण केले आहे. यातून पादचाऱ्यांना चालणेदेखील जिकरीचे झाले आहे.

दुचाकी वाहन चालकाला तर तारेवरची कसरत करावी लागत आहे. यातून जाणारे येणारे डंपर चालक सुसाट असतात ते दुचाकीचा विचार करत नाहीत, रस्त्यावर अनेक खड्डे पडलेले आहेत त्यामध्ये सतत पडणाऱ्या पावसाचे पाणी साचत असल्यामुळे दुचाकी वाहनचालकाला खड्ड्यांचा अंदाज येत नाही. वरसगाव पेट्रोल पंपा समोर खड्डे अंतराने पडलेले आहेत. या ठिकाणी खड्डे चुकविताना अपघात होण्याची तसेच वाहनांची समोरासमोर ठोकर होण्याची दाट शक्यता आहे. रस्त्यावर जागोजागी पडलेल्या खड्ड्यामुळे वाहनांच्या रांगा लागत असून लांब प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा खोळंबा होत आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याने निदान खड्डे बुजवून वाहनांची आणि प्रवाशांची होणारी हेळसांड थांबवावी अशी नागरिकांची मागणी आहे.

# फाळणीचा फतवा

एकेकाळी गुजरात ही भाजप आणि संघाची प्रयोगशाळा आहे असे मानले जायचे. प्रयोगशाळेमध्ये उंदीर आणि बेडकांवर आधी प्रयोग होतात. त्यातून काढलेले निष्कर्ष माणसाला लागू केले जातात. हिंदुत्वामध्ये माणसेच उंदीर आणि बेडूक होतात. त्यांना हिंदुत्वाचे विचार टोचले की त्यांचा मेंदू आणि हृदय बधीर होते. ते विचार करायचे थांबतात. त्यांच्यातील माणुसकी संपते. ते एका समाजाचा, म्हणजे मुस्लिमांचा द्वेष करू लागतात. प्रत्येक गोष्ट फक्त हिंदू विरुध्द मुस्लिम अशा वादाच्या चष्म्यातूनच पाहू लागतात. गुजरातच्या प्रयोगशाळेत हिंदुत्वाचे विष भिनलेली भरपूर प्रजा तयार झाली. आता ही प्रयोगशाळा उत्तर प्रदेशात हलवण्यात आली आहे. उत्तर प्रदेशाची लोकसंख्या सुमारे २५ कोटी आहे. म्हणजे गुजरातच्या तीन ते चार पट. त्यामुळे एकदम मोठा लॉट इथून निघेल अशी भाजपची अपेक्षा होती. अजूनही आहे. त्यासाठी तेथून नवनवीन कल्पना बाहेर निघत असतात. अशीच एक भयानक विषारी व भरपूर द्वेष निर्माण होऊ शकेल अशी कल्पना त्या राज्यातील मुजफ्फरनगरमध्ये निघाली आहे. दरवर्षी चातुर्मासामध्ये इथून कावड यात्रा जाते. यात्रेकरू हरिद्वार किंवा गंगोत्री इत्यादी ठिकाणचे गंगेचे पाणी कावडीत भरून घेऊन आपापल्या भागात जातात. तेथे स्थानिक शंकराच्या देवळात त्या पाण्याचा अभिषेक केला जातो. थोडक्यात देहू-आळंदीहून पंढरपूरला दरवर्षी जाणाऱ्या वारीसारखीच ही एक यात्रा असते व तेथेही बहुतांश यात्रेकरू हा प्रवास पायी करतात. या यात्रेच्या काळात मुजफ्फरनगरच्या दुकानदारांचा व तेथे काम करणाऱ्या माणसांचा धर्म कळेल अशा रीतीने दुकानावर फलक लावायला हवेत असा आदेश तेथील प्रशासनाने काढला आहे. ही कावड घेऊन जाणारे अर्थातच उपास वगैरे करतात. सात्विक आहार घेतात. मांस इत्यादी खात नाहीत. त्यांना विटाळ होऊन समाजात तणाव निर्माण होऊ नये यासाठी हा नियम करण्यात आल्याचे प्रशासनाने म्हटले आहे.

## शेकडो वर्षांनंतरचा विटाळ

गंमत अशी आहे की, ही परंपरा शेकडो वर्षांपासून चालत आली आहे. या मार्गावरच्या मुस्लिमांच्या वस्त्या व दुकाने आज निर्माण झालेली नाहीत. अगदी पुरातन काळापासून हे कावडिये येथून जात-येत होते व मुस्लिम त्यांना पाणी, खाणेपिणे देत होते. मुख्यतः फळे विकत होते. त्यात कोणालाही काही वावगे किंवा धार्मिक भावना दुखावणारे वाटत नव्हते. किंबहुना, आपल्याकडच्या बहुतेक सर्व हिंदू देवस्थानांशी मुस्लिम दुकानदार, व्यापारी, कारागीर इत्यादींचा फार निकटचा संबंध आहे. पश्चिम बंगालमधील दुर्गापुजेच्या बहुतांश मूर्ती व देखावे हे मुस्लिम कारागीर घडवतात. पंढरपुरात बुक्का किंवा कुंकू किंवा इतर शोभेचे सामान तयार करणारे व विकणारे मुस्लिम आहेत. पुण्यात मंडईपाशी पुजेच्या याच सामानाची विक्री करणारे बहुतेक दुकानदार मुस्लिम आहेत. तुळजापूर, कोल्हापूर येथेही हाच प्रकार आहे. भारतातल्या सर्व भागांमध्ये अशी ठळक उदाहरणे आहेत व लोकांना त्यात काही वेगळे आहे असे वाटत नाही. मुस्लिमांकडची फळं खाल्ल्याने किंवा त्यांनी केलेले हार देवाला वाहिल्याने धर्माला बाट येतो असा विचारही आजतागायत कधी कोणाच्या डोक्यात आला नव्हता. भाजपच्या नीच आणि नतद्रष्ट हिंदुत्व प्रयोगशाळेत हा किडा करण्यात आला व काही मूर्ख लोकांच्या डोक्यात घुसवण्यात आला. याच्या आधारे सत्ता मिळू शकते असे लक्षात आल्यावर मतलबी राजकारण्यांनी त्याला अधिक हवा दिली. त्यातून तो फोफावला आणि मुजफ्फरनगरसारखे फतवे निघू लागले. कावड यात्रेकडे इतकी वर्षे फारसे कोणाचे लक्ष नव्हते. मात्र सध्या हरेक गोष्टींची इव्हेंटबाजी आणि प्रदर्शन केले जाते. तसे इथेही घडले. आपल्या वारीप्रमाणेच शहरी, मध्यमवर्गीयही तिच्यात सामील होऊ लागले. सोशल मिडियातून त्याची प्रसिद्धी होऊ लागली. हर तऱ्हेची व्यापारी मंडळी तिच्यात घुसली. आपल्याकडे वारकऱ्यांमध्ये धारकरी घुसवू पाहणारे तथाकथित गुरुजी उभे राहिले. तिथे तर साक्षात मुख्यमंत्री याच विषारी पंथाचे वाहक. त्यामुळे अशा धर्मांध विचारांना तेथे थेट सत्तेतूनच पाठिंबा मिळतो आहे.

## दुसरी फाळणी होईल

प्रशासनाने गेल्या आठवड्यात पहिला फतवा काढला. त्यानुसार मुस्लिम व्यापारी व फेरीवाले किंवा रस्त्याच्या कडेचे चहावाले इत्यादींनी आपापल्या नावाच्या पाट्या ठळकपणे आपल्या ठेल्यांवर लावल्या. त्यामुळे हे दुकान मुस्लिमाचे आहे हे कळू लागले. आता या आदेशाची सक्ती नसून प्रत्येकाने स्वेच्छेने अशी पाटी लावावी किंवा लावू नये असे सांगण्यात आले आहे. मात्र त्यामुळे मूळ प्रश्न बदलत नाही. मुस्लिम व्यापाऱ्यांवर बहिष्कार घालावा असे फतवे हिंदुत्ववाद्यांमधले अधिक माथेफिरू लोक अधूनमधून काढत असतात. यातही गंमत अशी असते की, ज्या जैन आणि गुजराती लोकांचे भाजप व संघावर सध्या वर्चस्व आहे त्यांचा मुस्लिमांसोबतचा व्यापार सुखनैव चालू असतो. त्यांना कोणताही विटाळ होत नाही. मुस्लिम देशातून येणारा खजूर किंवा इतर सुकामेवा या मंडळींना उपासालासुध्दा चालतो. पण किरकोळ धंदेवाल्यांच्या पोटावर मात्र हे पाय आणू पाहतात. अर्थातच, भारतभरातल्या सर्व शहरांमधले वास्तवच असे आहे की, तेथील मुस्लिम फेरीवाले किंवा व्यापारी यांना टाळणे हे कोणालाही शक्य नाही. खुद्द उत्तर प्रदेशात तर खेड्यापाड्यांमध्येही हेच वास्तव आहे. तरीही असे आदेश निघतात. त्यातून लोकांची माथी भडकावण्याचा उद्देश असतो. आज कदाचित ही कल्पना अशक्यप्राय वाटेल. पण वीस वर्षांनी ती लोकांच्या डोक्यात इतकी रुजवली जाईल की आपोआप तसे घडेल अशी या फतव्यांमागची भूमिका असते. आज मुंबईसारख्या शहरात बहुसंख्य सोसायट्यांमध्ये मुस्लिम नको अशी भावना व्यक्त केली जाते. मुस्लिम नोकरदारांना घरे मिळू शकत नाहीत. त्यांना मुस्लिम मोहल्ल्यांमध्येच जावे लागते. मुस्लिम व्यापाऱ्यांवर बहिष्काराचा आज हास्यास्पद वाटणारा आदेश आणखी दहा वर्षांनी प्रत्यक्षात येऊ लागलेला दिसू शकेल. ही अत्यंत भयावह परिस्थिती आहे. मुस्लिम माथेफिरू नेत्यांमुळे १९४७ मध्ये या देशाची एकदा फाळणी झालेली होती. आता हिंदू माथेफिरुंमुळे दुसरी फाळणी होण्याचा धोका आहे. आणि, हे पाप सर्वस्वी मोदी-शाह-योगींचे असेल.

विचार

# आव्हान दिवट्यांच्या बेदरकार वृत्तीचे

***पुणे, मुंबईतील हिट अँड प्रकरण असो की पूजा खेडकर आणि तिच्या मातापित्यांचे प्रताप असोत, तिन्ही उदाहरणे बेदरकार प्रवृत्ती आणि बेभान तरुणाईचे चित्र दाखवण्यास पुरेशी आहेत. खेरीज यातून ढासळत्या कुटुंबव्यवस्थेचे आणि कोसळणाऱ्या नीतीमत्तेचे दर्शन घडते. मुलांना पैसा किती पुरवायचा, कधी पुरवायचा, संस्कारांची शिदोरी कधी द्यायची याचे भान हरपलेल्या अनेक पालकांनी अशा घटनांकडे सजगतेने पहायला हवे.***



**प्रा. नंदकुमार काळे**

सध्या महाराष्ट्रात 'हिट अँड रन' प्रकरणे गाजत आहेत. मद्य, सत्ता, यौवनाचा कैफ, आपली पत आणि खोटी प्रतिष्ठा दाखवून देण्याची खुमखुमी, श्रम न करता खिशात खुळखुळत असणारा पैसा अशा एक ना अनेक कारणांमुळे उन्मत्त झालेली तरुणाई जणू सगळे जग आपल्या पायाखाली असल्याच्या मस्तीत मोकाट सुटल्याचे चित्र आज दिसत आहे. अपघात हा अपघात असतो हे मान्य केले तरी त्यासाठी कोण कारणीभूत आहे, तो कोणाच्या कोणत्या चुकीमुळे झाला याचे विश्लेषण करणेही गरजेचे ठरते, कारण त्याखेरीज अशा घटना कमी करण्यासाठी उपाययोजना करणे अशक्य आहे. मात्र हे करताना समोर दिसणारे वा जाणवणारे वास्तव अत्यंत भयावह आहे, असेच म्हणावे लागेल.

सध्या राज्यात दोन दिवट्यांचे प्रताप आणि त्यांच्या कृष्णकृत्यांना असणारी पालकांची साथ हा विषय अनेक वादांना तोंड फोडून जाणारा आहे. यात पैशाची, सत्तेची मस्ती उघडपणे दिसत आहे. त्याला आता पूजा खेडकर प्रकरणाचीही जोड मिळाल्यामुळे विषयाचे गांभीर्य शतपटीने वाढले आहे. पुणे पोर्शे कार प्रकरण, वरळी हिट अँड रन आणि ताज्या पूजा खेडकर प्रकरणातील साम्य सांगायचे झाल्यास या तीनही 'बाळां'ना पैशाने लाडावून ठेवले आहे. त्यांना पैसा, सत्ता आणि अधिकारांची मस्ती चढली आहे. दोन दिवटे आणि एक दिवटी कोणत्या थराला जातात आणि आपण काहीही केले तरी कोणी काहीच वाकडे करू शकणार नाही, हा मस्तवालपणा या मुलांमध्ये आला कुठून असा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. हा मस्तवालपणा, कायदा झुगारण्याची वृत्ती अनुवंशिक आहे की काय, असा प्रश्न पडावा असे या तीन उदाहरणांमधून वाटू लागते. या प्रकरणांमध्ये मुले दोषी आहेत यात कोणताही वाद नाही; परंतु त्यांच्यापेक्षा अधिक दोष पालकांचा आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

वेदांत अग्रवाल, मिहीर शहा आणि पूजा खेडकर यांच्या कुटुंबीयांचे मुलांच्या गंभीर गुन्ह्यानंतरचे वर्तन पाहिले तर आपण जगापेक्षा कुणीतरी वेगळे आहोत, कोणताही कायदे आपल्याला लागू होत नाही, पैसा-सत्ता- संपत्तीच्या बळावर आपण काहीही करू शकतो, ही मिजासखोरी भूमिका त्यांच्या वर्तनातून दिसते. मग मुलेही त्यांच्या पायावर पाऊल ठेवत तशीच वागतात. चरित्र चांगले असावे, काम शुद्ध भावनेने करावे. कुणाचेही वाईट होणार नाही याची काळजी घ्यावी हा चांगला विचार मनात येण्यासाठी तसे चांगले संस्कार होण्याची गरज असते. म्हणूनच बालपणापासून मनावर झालेले संस्कार अत्यंत मोलाचे आणि महत्त्वाचे ठरतात. संत तुकाराम महाराज म्हणतात,

**शुद्ध बीजापोटी । फळे रसाळ गोमटी ।।**
**मुखी अमृताची वाणी ।**
**देह देवाचे कारणी ।।**
**सर्वांग निर्मळ । चित्त जैसे गंगाजळ ।।**
**तुका म्हणे जाती । ताप दर्शने विश्रांती ।।**

चांगली अपेक्षा कुणाकडून करावी? तर त्याचेही काही मापदंड ठरले आहेत. आंब्यांच्या झाडापासून मधुर फळांची अपेक्षा केली जाते. बाभळीचे झाड आयुष्यभर काटेच देते. म्हणजेच बीज लावले, तसे त्याला फळ येत असते. प्रल्हाद शिंदे यांच्या गाण्यातील ओळी नुसत्या गुणगुणण्यासाठी नसतात. त्या आचरणात आणण्यासाठी असतात. म्हणूनच 'जैसे ज्याचे कर्म तैसे फळ देतो ईश्वर' असे केवळ म्हणून उपयोग नाही तर तो विचार मनात रुजवणे गरजेचे आहे. तसे वेळीच झाले असते तर ही धनिकांची बाळे वाया गेली नसती. मात्र दुर्दैवाने काही घरांमध्ये तसे घडताना दिसत नाही.

आज प्रशासकीय सेवेत मराठी मुले कमी आहेत. आता कुठे प्रशासकीय सेवेत मराठी युवक-युवतींचे प्रमाण वाढताना दिसत आहे. पण असे असताना पूजा खेडकरसारखे प्रकार पुढे येत असतील, तर मुलांचे यशही झाकोळून जाते. डॉ. पूजाची बदली झाल्यानंतरच ती चर्चेत आली. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत तिने खोट्या प्रमाणपत्राद्वारे पद मिळवल्याचा प्रकार उघड झाला आणि चर्चेला तोंड फुटले. बहुविकलांग आणि मानसिक आजारी असल्याचा दावा करत त्या आधारे पूजा आयएएस झाली. खरे पाहता तिला सहा वेळा वैद्यकीय चाचणीसाठी बोलवले होते; परंतु सहाही वेळा ती हजर राहिली नाही. त्याऐवजी तिने बाहेरुन वैद्यकीय अहवाल दिला. अर्थातच केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकारणा (कॅट) कडून बाहेरचा अहवाल नाकारला होता. पण नंतरच्या काही घडामोडींमध्ये तो अहवाल स्वीकारला गेला. आता पूजाची हुशारी किती हे व्हायरल झालेल्या क्लिपमधून समोर आले आहे. मुलाखतीमध्ये तिला महाराष्ट्राशी संबंधित दोन प्रश्न विचारले होते; परंतु त्याची उत्तरे देता आली नाहीत. 'मॉक इंटरव्ह्यू' मध्ये तिला बीड जिल्ह्यामध्ये महिलांच्या गर्भपिशवी काढून टाकण्यात आल्याच्या प्रकरणाशी संबंधित प्रश्न विचारण्यात आला होता. तेव्हा हे प्रकरण राज्यभरात नव्हे तर देशभरात गाजले होते. मात्र त्याबद्दल पूजाला काहीही माहीत नव्हते. असे असूनही तिची निवड झाली. यामुळे तिच्या नियुक्तीपुढे प्रश्नचिन्ह उभे राहिले.

सरकारी नोकरीत असतानाच पूजाने 'पूजा ऑटो' नावाची कंपनी स्थापन केली. दुसरी बाब म्हणजे पूजाने केंद्रीय नागरी सेवा आयोगाला सादर केलेल्या अपंगत्वाच्या प्रमाणपत्रांव्यतिरिक्त 'ओबीसी नॉन क्रिमीलेयर' प्रमाणपत्रातही काही विसंगती आढळली. आठ लाखांच्या आतील उत्पन्न असलेल्यांनाच 'क्रिमी लेअर'चा फायदा मिळतो. मात्र प्रत्यक्षात वडीलांचे उत्पन्न ४० कोटींचे असतानाही तिने हा फायदा लाटला. तिच्या वडिलांनी अहमदनगर लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. खेरीज पूजा अनेकदा व्हीव्हीआयपी श्रेणीत मोडणाऱ्या मागण्यांसाठी चर्चेत राहिली. वैयक्तिक ऑडी कारवर लाल दिवा आणि व्हीआयपी नंबर प्लेट लावण्यापुरतेच तिचे गुन्हे मर्यादित नाहीत. ही यादी बरीच मोठी आहे.

पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी सामान्य प्रशासन विभागाला सादर केलेल्या अहवालानुसार तीन जून रोजी कर्तव्यावर रुजू होण्यापूर्वीच पूजाने स्वतंत्र केबिन, कार, निवासी क्वार्टर आणि एक शिपाई देण्याची मागणी केली होती. प्रशिक्षणाच्या कालावधीत या सुविधांचा वापर करता येत नाही. असे असतानाही तिने दबाव निर्माण करत एका अधिकाऱ्याच्या दालनाचा ताबा घेतला. त्यातील फर्निचर बदलले. वैयक्तिक गाडीवर 'महाराष्ट्र सरकार' असा फलक लावला. मुख्य सचिव सुजाता सौमित्र यांच्या दालनातही ती दांडगाईने शिरली. पुणे जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालानंतर तिला वाशिमला पाठवण्यात आले; परंतु दरम्यानच्या काळात पंतप्रधान कार्यालयानेच चौकशी सुरू केल्याने आता ती आयएएसपद राहते की नाही, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

हे खेडकर कुटुंब मूळ पाथर्डी तालुक्यातील भालगावचे. या कुटुंबाचा पंकजा मुंडे यांच्याशी राजकीय संबंध आहे. तसेच या भागातील वनजमीन दांडगाईने कसत असल्याचा आरोपही या कुटुंबावर आहे. यासंदर्भात पोलीस चौकशीला गेल्यानंतर त्यांना दमदाटी करणे, वाहिन्यांच्या कॅमेऱ्यावर हल्ला करणे, मुळशी तसेच बारामतीमध्ये जमीन खरेदी प्रकरण, मुळशीतील शेतकऱ्यांच्या जमिनीवर अतिक्रमण, तक्रार करणाऱ्या शेतकऱ्यांना पिस्तूल दाखवणे, बाऊन्सर घेऊन त्या परिसरात जाणे असे प्रकार पूजाच्या आईनेही केले आहेत. त्यामुळेच पालक असे असतील तर मुले कशी निपजणार? अगरवाल आणि खेडकर कुटुंबीयांची मुले याचे उत्तर आपल्या उत्तरातून देतात.

पूजाचे वडील आणि आजोबा निवृत्त प्रशासकीय अधिकारी आहेत. अशी पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबाला खरे तर नियमांची माहिती असायला हवी. मात्र तेच नियम वाकवून ते अनाचार करत असल्यास ढासळत्या नितीमत्तेचे दर्शन घडते. पूजाच्या वडिलांवरही मुलीला सुविधा देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांवर दबाव आणल्याचा आरोप आहे. आता पंतप्रधान कार्यालयाने पुणे जिल्हाधिकाऱ्यांकडून पूजाच्या शारीरिक अपंगत्व श्रेणी आणि पद मिळवण्यासाठी 'ओबीसी' कोट्यातील लाभांचा गैरवापर केला का, हे तपासण्यासाठी अहवाल मागवला आहे. याशिवाय प्रशासकीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणाऱ्या 'लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासकीय अकादमी'ने या प्रकरणी महाराष्ट्र सरकारकडून अहवाल मागवला आहे. पूजाचे व्हॉट्स ॲप चॅट्सदेखील समोर आले आहेत. त्यात ती केबिन, प्रवास इत्यादींबाबत अपडेट्स विचारताना दिसत आहे. या प्रकरणाच्या चौकशीसाठी केंद्र सरकारने समिती स्थापन केली आहे. ही समिती पूजाच्या निवडीबाबत केलेले दावे आणि इतर तपशीलांची चौकशी करेल. यातून सत्य समोर येईलच. योग्य ती कारवाईही होईल. पण या सर्व प्रकरणातून समोर येणारी मुलांची तसेच त्यांच्या कुटुंबियांची बेदरकार मानसिकता कशी सुधारणार हा खरा प्रश्न आहे.

आजकाल

# पर्यटकांनी स्वतःच काळजी घ्यायला हवी

**रेणुका खोत**

Travel Vlog बनवणारे सांगतात इथे जा तिथे जा पावसाळ्यात भन्नाट मजा येते. कसला पाऊस अहाहा मजा. पण ते सांगतात तिथे ऑफ बिट डेस्टिनेशन आहे लाख सांगतील लगेच विश्वास ठेऊन जाऊ नका. पावसाळ्यात सगळेच सुंदर आणि स्वर्गीय सौंदर्य दिसते पण लगेच अशी ठिकाणे शोधत तिथे जायला हवं का, ह्याचा विचार करा. सगळीकडे धुके असते, निसरडे झालेले असते. लांबून जे दिसते ते ठीक असे काहींना वाटत नाही अजून अजून पुढे जात एक्सप्लोअर करायचा काहींना किडा असतो. रिस्क है तो इश्क है. अरे पण घरी माणसं आहेत ना तुमच्या. त्यांचा काही विचार.

एका तरूणीचा असाच जीव गेलेला आहे. रील बनवताना असं म्हणतात खरं खोटं माहीत नाही. ती रील बनवत होती की काय करत होती. पण काळ आला होता हेच खरे. ती होती. तिला शोधायला गेलेल्या तरूणांच्या बचावगटाने फार कष्टाने तिला शोधून काढले. असं कुठे तरी जायचं आणि काही झाल्यावर सगळ्यांना त्रास होतो शोधाशोध करायला. त्या मुलीचा मृतदेह शोधायला बचावगटाची माणसे धुक्याने भरलेल्या त्या दरीत उतरली. तो व्हिडिओ पाहूनही भिती वाटली. ह्या पोरांना काही होऊ नये देवा हेच मनात. जो व्हिडिओ मी पाहिला ते एक कड्याचे टोक होते खाली दरी. पूर्ण धुके. अशा ठिकाणी प्रचंड वारा असतो. सतत ओल असते. पाहूनही भिती वाटली. निसर्गाने काही जागा अशा ठेवलेल्या आहेत जिथे माणसांनी जाऊ नये अशाच अडनिड्या बनवल्या आहेत तर मग लांब रहावं ना थोडं.

हल्ली तर अचानक पाणी वाढते माणसे वाहून जातात असेही व्हिडिओ दिसतात. लहान मुलांच्या तर हातात काहीच नसते. मोठी माणसं सांगतात तिथे जातात बापडी. थोडा निसर्ग कमी दिसला तरी चालेल पण जिथे रिस्क आहे तिथे नको ते एडव्हेंचर करायला का जावे? तसं पाहिलं तर उभ्या उभ्या बसल्या जागी मृत्यू गाठू शकतो पण मुद्दाम उठून आमंत्रण कशासाठी. वर लोकं विश्वास ठेवतात. ते सुचवतात अशा ठिकाणी माणसं जातात. जागा सुचवताना कुणी इथे येऊन काही दुर्घटना घडण्याची शक्यता आहे का ह्याचाही विचार ह्या लोकांनी केला पाहिजे. लाईक्स फॉलोअर्स मिळवण्याच्या नादात नको ते होऊन बसायचे ही जागा नको सांगायला असा विचार केला पाहिजे. काय होईल थोडा निसर्ग कमी दिसेल पण जीव तरी जाणार नाही कुणाचा. एका तरूण मुलीचा अशा पद्धतीने झालेला मृत्यू अत्यंत दुर्दैवी आहे. थोडं घाबरणे चांगलं आहे. निदान ओव्हर कॉन्फिडन्ट तरी असू नये. अनोळखी ठिकाणी आग, पाणी ह्यांच्याशी मस्ती करायला जाऊ नका. अनोळखी पाणी, रस्ते फसवू शकतात. अनोळखी गाव शहर असेल तिथे बिनधास्त फिरतानाही अत्यंत काळजी घ्यायला हवी. सातच्या आत घरात हे पूर्वीचे तत्व होते. त्यातले मर्म ओळखायला हवे. दिवसा काय उलथायचे ते उलथा रात्री अपरात्री कसली रे मजा जुनी माणसं म्हणत. वेडे होते का ते? कधी कधी पालक मुलांना समजावून सांगतात पण अशा पालकांना वेडपट, कंट्रोल फ्रीक समजले जाते. सगळ्याचा संबंध सुजाण पालकत्व आणि पालकांनी मुलांशी कसे वागले पाहिजे ह्याच्याशी हल्ली लावला जातो. चांगले काही सांगणारे पालक आऊटडेटेट ठरवले जातात. ही सक्ती आहे असेच वठवले जाते. पूर्वीच्या काळी हा सूरही अनेकांना त्रासिक वाटतो. पण खरेच आहे. पूर्वी आईने सांगितले बाबांनी सांगितले की मुलं गप ऐकत. आता लगेच का असं काय करू आम्ही असं होतं. शिवाय आपण मुलांना काही सांगतो ते मुलं ऐकत नाहीत हे खुलेपणाने सांगण्याचीही चोरी झाली आहे कारण पालकांना जज केले जाते. पूर्वी मुलांना ओरडले एखाद्या वेळेस गरज म्हणून डोके फिरले म्हणून आईने फटका दिला तर त्याचे त्यांना काही अपराधीपण येत नव्हते. आले तरी त्या दाखवत नसत. आईबाबांना काय वाटेल हा विचारही फारच भक्कम होता त्यामुळे काही करताना मुलेही दहा वेळा विचार करायची. बरे होते ते दिवस. कुणाला आपली काळजी वाटते आणि वेळेनुरूप प्रसंगानुरूप ती काळजी म्हणजे काळजीचा केलेला बागुलबुवा नाही हे समजले पाहिजे. बिनधास्त रहा बिनधास्त फिरा पण काही नियम पाळून.

अशा दुर्गम ठिकाणी जाण्याची हौस असते कारण तिथे गर्दी कमी असते. मग तिथले फोटो व्हिडिओ सोशल मिडियावर टाकले की वॉव येतात शेकडो लाईक्स येतात. पण फट् म्हणता ब्रह्महत्या झाली की काय करायचे त्या सगळ्या लाईक्स आणि कमेंटांचे. सोशल मिडियासाठी जगू नये कुणाला दाखवायला जगू नये. जिवंत राहण्यासाठी जगण्याकरिता खबरदारी घेणे गरजेचे आहे. अशा ठिकाणी जाणे सुचवणार्या ह्या लोकांवर सरकारने कारवाई केली पाहिजे. निदान ताकीद तरी. अत्यंत दुर्गम ठिकाणी लहान मुलांना घेऊन जाण्यावर बंदी आणली पाहिजे हे मात्र नक्कीच वाटतं. मोठ्यांना डोकं असतं, वापरलं तर. सरकार तरी कुठे कुठे पाहील?

**(साभार)**

**लोकसंसद**

## जीवघेणे रील बनवण्याचे वेड कसे थांबणार?

सोशल मीडियावरच्या विविध प्लॅटफॉर्मवर अधिकाधिक लाईक्स आणि कमेंट मिळविण्यासाठी तरुणाईला चित्रविचित्र रील बनवण्याचे वेड लागले असून या वेडापायी अनेकांना असे जीवघेणे रील बनवताना मृत्यूला सामोरे जावे लागले आहे. वर्षभरापूर्वी छत्तीसगडमधील एका महाविद्यालयात एका २० वर्षीय कॉलेज तरुणाचा कॉलेज इमारतीच्या टेरेसवर रीलचे चित्रीकरण करताना खाली पडून मृत्यू झाला. तीन महिन्यांपूर्वी उत्तर प्रदेशातील २१ वर्षीय शिवम याचा शाळेच्या टेरेसवर उलटा टांगून रील बनवताना शाळेची स्लॅब कोसळून जागीच मृत्यू झाला. गेल्या महिन्यात तेलंगणाच्या वारंगलमध्ये एका २३ वर्षीय तरुणाचा एका चित्रपटातील फाशीच्या मृत्यूच्या दृश्याचे रील तयार करताना चुकून गळा दाबला गेल्याने मृत्यू झाला. महिनाभरापूर्वी छत्रपती संभाजीनगरच्या एका तरुणीला रील बनवण्याच्या नादात कार दरीत कोसळल्यामुळे आपले प्राण गमवावे लागले. अगदी ताज्या घटनेत अन्वी कामदार या तरुणीचा रायगडच्या माणगावमध्ये धबधब्याच्या ठिकाणी रील करताना खोल दरीत कोसळून मृत्यू झाला. तरुणांचे असे जीवघेणे रील बनवण्याचे वेड काही थांबत नाही. अशावेळी जीवघेणे रील बनवण्याचे वेड कसे थांबणार? हाच खरा प्रश्न आहे.

**- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२० जुलै**

**१८१५:-** राजकारणी, आत्मवृत्त लेखक गंगाधरशास्त्री कृष्णाजीपंत पटवर्धन यांचे निधन. वाई येथे शास्त्राभ्यास केल्यांनतर बडोद्याच्या गायकवाड महाराजांच्या पदरी दिवाण म्हणून कार्यरत. गंगाधरशास्त्री एक उत्तम राजकारणी आणि मुत्सद्दी होते. त्या जोरावरच त्यांनी इंग्रजांशी मैत्री केल्याने ते पेशव्यांशी फटकून वागू लागले याचा दुसऱ्या बाजीरावास राग आला. तेव्हा बाजीरावाने ते पंढरपुरात असताना आपल्या हस्तकांकडून त्यांचा खून केला. तत्पूर्वी त्यांनी 'गंगाधरशास्त्री पटवर्धनांचे आत्मचरित्र' या नावाने आपले आत्मकथन लिहिले होते. उत्तर पेशवाईचा इतिहास समजण्यासाठी ते एक महवाचे संदर्भ साधन आहे. **१८२५:-** निबंधकार, वैदिक धर्माचे प्रचारक, लेखक विष्णू भिकाजी गोखले तथा विष्णुबुवा ब्रम्हचारी यांचा जन्म. ख्रिस्ती धर्माच्या विरोधात मोहिम. त्याकाळात मुंबईच्या समुद्रकिनाऱ्यावर ख्रिस्ती मिशनरी विरुध्द विष्णुबुवा असा सामना रंगत असे. यावर आधारित 'समुद्रकिनारींचा वादविवाद' हा ग्रंथ जी. बोईन यांनी प्रसिध्द केला. याशिवाय विष्णुबुवांनी 'भावार्थसिंधू', 'वेदोक्त धर्म प्रकाश' 'सुख दायक राज्यप्रकरणी निबंध', 'वेदोक्त धर्माचा विचार व ख्रिस्तीमंडन' आदी ग्रंथ लिहिले. **१८५३ :-** ज्योतिर्विद आणि गणितज्ञ शंकर बाळकृष्ण दिक्षित यांचा जन्म. 'भारतीय ज्योतिषशास्त्र' ह्या ग्रंथातून वेदकाळापासून ते चालू घडीपर्यंतचा सविस्तर इतिहास दिक्षितांनी लिहिला. तसेच प्राचीन भूगोलवर्णन असलेला 'भारतभूवर्णन' हा ग्रंथ आणि मॅक्समुल्लरच्या पुस्तकांचे 'धर्ममीमांसा' या नावाने भाषांतर केले. **१८९८:-** वैद्यकीय पुस्तकांचे लेखक विष्णू गोपाळ आपटे यांचे निधन. डॉक्टर असणाऱ्या आपटयांनी 'ग्रामवैद्य अथवा खेडयांतील प्रजा निरोगी राहण्याचे उपाय', 'न्यायवैद्यक' तसेच 'प्रसूती चिकित्सा' ही पुस्तके लिहिली. तसेच इंग्रज सरकारने तयार केलेल्या 'डोमेस्टिक एकॉनॉमी' या ग्रंथाच्या मराठी भाषांतरा साठी प्रो. बा. प्र. मोडक यांना सहाय्य केले. **१९०९:-** मराठी, हिंदी, इंग्रजी आदी भाषांतून लेखन करणारे डॉ. पुरुषोत्तम जय.पा देवसर यांचा जन्म. ह्यांचा 'भारतातील सर्पसृष्टी' हा ग्रंथ १५ भाषांमध्ये अनुवादीत झाला असून त्यास आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली आहे. याशिवाय 'अनुभवाचे जग' हे प्रवासवर्णन आणि 'विज्ञान अवाक्ष' हा विज्ञान विषयक ग्रंथ अशी साहित्य संपदा. **१९१९:-** महाराष्ट्र साहित्य-संस्.ती मंडळाचे माजी अध्यक्ष सुरेंद्र शिवदास बारलिंगे यांचा जन्म. १३ मराठी, ६ हिंदी व ८ इंग्रजी पुस्तके त्यांनी लिहिली. 'इंडियन फिलॉसाफिकल क्वार्टरली', 'परामर्श व थिंकर्स अकॅडमी जर्नल' (ताज) ही नियतकालिके त्यांनी सुरु केली. **१९३०:-** महाराष्ट्रातील धर्म, तवज्ञान, संस्कृती, लोकसंस्कृती, लोकसाहित्य, संतसाहित्य आणि काव्यशास्त्र याविषयी संशोधन करणारे व्रतस्थ संशोधक, अभ्यासक, लेखक आणि संपादक, महाराष्ट्राच्या धर्मेतिहासाचा सखोल, सूक्ष्म आणि सर्वांगीण अभ्यास प्रतिभा बुध्दीने करणारा संशोधक म्हणून देशविदेशातील संशोधकात रा. वि. ढेरे यांची ओळख आहे. त्यांच्या ग्रंथसंपदेत श्री विठ्ठल एक महासमन्वयक, खंडोबा, लोकसंस्कृतीचे उपासक, लोकसंस्कृतीचे क्षितिजे, संत साहित्य आणि लोक साहित्य, भारतीय रंगभूमीच्या शोधात, संत लोक आणि अभिजन हे त्यांचे ग्रंथ त्यांची विद्वता आणि संशोधन वृत्तीचा प्रत्यय घडवून आणतात. **१९३७:-** तत्कालिन घटनांवर वृत्तपत्रातून परखडपणे लेखन करणारे लेखक प्रा. डॉ. गुरुनाथ दत्तात्रय नागगोंडे यांचा जन्म. ह्यांच्या लेखनसंपदेत 'औद्योगिक समाजशास्त्र', 'ग्रामीण समाजशास्त्र', 'भारतीय आदिवासी', 'समाजशास्त्रांची मुलतत्वे' अशी ग्रंथ संपदा. **१९४०:-** लेखक आत्मचरित्रकार देवराज कामथवार यांचा जन्म. चित्रपटसृष्टीतल्या झगमगत्या दुनियेत वावरणाऱ्या कामथवार यांनी आपला जीवनपट 'आयुष्य द्यामागचे' या आत्म चरित्रातून उलगडला. तसेच 'सून माझी लक्ष्मी' या चित्रपटाचे स्क्रीप्ट त्यांनी लिहिले आहे. याशिवाय हिंदी भाषेतूनही त्यांची काही पुस्तके प्रकाशित झाली आहेत. **१९४३ :-** तत्त्वचिंतक, कादंबरीकार, साहित्य समीक्षक वामन मल्हार जोशी यांचे निधन. 'रागिणी उर्फ काव्यशास्त्रविनोद' ही त्यांची पहिलीच कादंबरी गाजली. त्यानंतरच्या कादंबऱ्यापैकी 'आश्रम हरिणी', 'नलिनी'त स्त्रीविषयक प्रश्नांची चर्चा, तर 'सुशीलेचा देव' आधुनिक काळातील स्त्रीचे प्रगल्भ चित्र या कादंबरीतून रेखाटले, तर 'इंदू काळे, सरला भोळे' या पत्रात्मक कादंबरी तून विवाह, घटस्फोट यावर मते व्यक्त केली. तवप्रधान व विचारगर्भ कादंबऱ्या लिहिणारे लेखक असा वा. म. जोश्यांचा नावलौकिक 'सॉक्रेटिस डायलॉग्ज' वरुन 'सॉक्रेटिसाचे संवाद' ह्या पुस्तकांशिवाय अनेक पुस्तके प्रसिध्द. याशिवाय 'नीतिशास्त्र प्रवेश' हा त्यांचा तात्विक ग्रंथ तर 'विचारविलाप', 'विचार सौंदर्य', 'विचारलहरी', 'विचार विहार' हे त्यांच्या वैचारिक निबंधाचा समावेश असलेले स्पूट लेखसंग्रह. त्यांचे समीक्षात्मक ललितलेखसंग्रह 'नातिशास्त्र प्रवेश' हा त्यांचा ग्रंथही तात्विक विषयावरील उत्कृष्ट ग्रंथ समजला जातो. **१९४८:-** कथालेखक, कादंबरीकार रत्नाकर विठ्ठल पटवर्धन यांचा जन्म. 'गर्भालय आणि लंघनमुर्ती' तसेच 'होलपट आणि सोपान' या लघु कादंबऱ्या प्रकाशित. **१९५२:-** कवी वासनिक कपूर लहूहास यांचा जन्म. ह्यांचा 'बंधमुक्त' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. **१९५३:-**विविध नियतकालिकांतून लेखन करणारे लेखक, दलित पँथर, युक्रांतचे सक्रिय कार्यकर्ते प्रा. श्रीरंग चोखोबा तलवारे यांचा जन्म. 'धूळपाटी' हा आत्मनिवेदनात्मक ग्रंथ त्यांच्या नावावर आहे. **१९५४:-**लेखक सुधाकर वायचळकर यांचा जन्म. 'देहदान', 'खरंच माझं काय चुकलंय?', 'आमचं काय चुकलंय?' या कथासंग्रहासह 'अभिलाषा', 'एक शुन्य' ह्या कादंबऱ्या आणि 'चिंता आणि चिंतन' हे वैचारिक इ. साहित्य प्रसिध्द. **१९७४:-** कादंबरी लेखक, आत्मकथनकार अशोक पवार यांचा जन्म. 'बिराड' या आत्मकथनासह 'इळणमाळ', 'दरकोस दर', 'मुक्काम आणि झड' ह्या कादंबऱ्या प्रसिध्द.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

# मोबाईल शॉप फोडणारे अल्पवयीन त्रिकूट अटकेत

**। पनवेल । वार्ताहर ।**

खारघर येथील मोबाईलचे दुकान फोडणाऱ्या तिघा अल्पवयीन आरोपींना गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अवघ्या २४ तासात ताब्यात घेतले. दरम्यान, गुन्हा उघडकीस आणत गुन्ह्यातील चोरीस गेलेला एकूण ३ लाख ८२ हजार रूपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्याची कामगिरी केली आहे.

खारघर से. ३४, येथील धनलक्ष्मी मोबाईल शॉपीचे शटर उचकटून दुकानातील मोबाईल फोन व इतर साहित्य चोरीस नेल्याची घटना घडली होती. याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात प्राप्त झाल्यानंतर पोलिसांनी अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल होताच, गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त अजयकुमार लांडगे यांनी गुन्ह्याच्या घटनास्थळी भेट देऊन अधिकारी व अंमलदार यांना तपासकामी सूचना दिल्या होत्या. त्यानुसार २४ तासांच्या आतमध्ये तीन विधीसंघर्षग्रस्त बालकांना खारघर परिसरातून ताब्यात घेऊन त्यांच्याकडून नमूद घरफोडीतून चोरून नेलेले मोबाईल फोन, मोबाईल अक्सेसरीज, रोख रक्कम व इतर मुद्देमाल असा एकूण ३ लाख ८२ हजार ४०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सहपोलीस आयुक्त संजय येनपुरे, गुन्हेशाखेचे अपर पोलिस आयुक्त दीपक साकोरे, गुन्हेशाखेचे पोलीस उपायुक्त अमित काळे, आदींनी हा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी मेहनत घेतली.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. कामतपाडा, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. १) प्रग्या चोक्सी २) श्रध्दा मित्तल यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| ११ | ९ | ०-६१-०० | ०-४७ |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २०/०७/२०२४ **ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

---

**महाराष्ट्र शासन**
**महसुल व वनविभाग**
तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालय, तळा जि. रायगड
दुरध्वनी क्रमांक- ०२१४०-२६९३१७ फॅक्स-२६९०४२
Email ID-tajasiltala@gmail.com

क्र. प्रशासन कात-५/जन्म-मृत्यू/जाहिर नोटीस/२४२७/२०२४ दि.१८/०७/२०२४

**जाहिर नोटीस मसुदा**

१. श्री. असीफ महामूद खान पठाण
मु.तळा ता. तळा जि.रायगड — अर्जदार
विरुध्द
१. निबंधक जन्म-मृत्यू व विवाह नोंदणी अधिकारी,
नगरपंचायत तळा
२. गट विकास अधिकारी पंचायत समिती तळा — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहिर नोटीस अन्वये कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार श्री. असीफ महामूद खान पठाण यांचा जन्म दि.०१/०६/१९७८ रोजी मौजे तळा ता. तळा, जि. रायगड येथे जन्म झाला त्यांचे जन्म नोंद सामनेवाल्यांचे कार्यलयीन अभिलेख सदरी नसल्यामुळे सामनेवाल्यानी तसा दाखला अर्जदार यांना दि.१२/०७/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांचा जन्म दि.०१/०६/१९७८ रोजी झाला असल्याचे घोषीत करुन जन्म दाखला आदेश मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे अथवा हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळविण्यात यावी.

सबब विहीत मुदतीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदार श्री. असीफ महामूद खान पठाण यांचा जन्म नोंदबाबत सदर प्रकरणी पुढील योग्य तो आदेश पारीत केला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दि.१८ जुलै, २०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

सही/-
**(स्वाती पाटील)**
कार्यकारी दंडाधिकारी तळा

---

**महाराष्ट्र शासन**
**महसुल व वनविभाग**
तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालय, तळा जि. रायगड
दुरध्वनी क्रमांक- ०२१४०-२६९३१७ फॅक्स-२६९०४२
Email ID-tajasiltala@gmail.com

क्र. प्रशासन कात-५/जन्म-मृत्यू/जाहिर नोटीस/२४२८/२०२४ दि.१८/०७/२०२४

**जाहिर नोटीस मसुदा**

१. श्री. फातिमा हुसेन खान पठान
मु.तांबडी ता. तळा जि.रायगड — अर्जदार
विरुध्द
१. निबंधक जन्म-मृत्यू व विवाह नोंदणी अधिकारी, — सामनेवाला
नगरपंचायत तळा

तमाम जनतेस या जाहिर नोटीस अन्वये कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार श्रीम. फातिमा हुसेन पठाण यांचा जन्म दि.०५/०६/१९७२ रोजी मौजे तळा ता. तळा, जि. रायगड येथे जन्म झाला त्यांचे जन्म नोंद सामनेवाल्यांचे कार्यलयीन अभिलेख सदरी नसल्यामुळे सामनेवाल्यानी तसा दाखला अर्जदार यांना दि.१२/०७/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांचा जन्म दि.०५/०६/१९७२ रोजी झाला असल्याचे घोषीत करुन जन्म दाखला आदेश मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे अथवा हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळविण्यात यावी.

सबब विहीत मुदतीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदार श्री. असीफ महामूद खान पठाण यांचा जन्म नोंदबाबत सदर प्रकरणी पुढील योग्य तो आदेश पारीत केला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दि.१८ जुलै, २०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

सही/-
**(स्वाती पाटील)**
कार्यकारी दंडाधिकारी तळा

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर सूचनेद्वारे असे कळविण्यात येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी मौजे वरसोली येथील सर्व्हे नंबर ४४ हिस्सा नंबर ३ क्षेत्र ०-३९-६ आकार ५=१२ ही मिळकत शाह मेघजी पालन उर्फ देढिया आणि हिरावती प्रेमजी देढिया यांचे खुद्द मालकीची आहे.

सदर मिळकत वर नमूद दोन्ही सहमालकांनी आमचे अशिल जोग इन्फ्रास्ट्रक्चर तर्फे प्रोप्रायटर प्रसाद अनंत जोग यांस विकसित करण्याकरिता दिली असून त्याबाबत सदर दोघा सहमालकांनी सामंजस्य करार तारीख १४/०५/२०१९ रोजी आमचे अशिलांबरोबर केला आहे. त्यानंतर सदर सर्व्हे नंबर ४४/३ या जमिनीच्या लगत पूर्वेकडील सर्व्हे नंबर ४२ हिस्सा नंबर ७ ही जमीन मिळकत आमचे अशीलांनी तारीख ०५/०८/२०२१ रोजीच्या खरेदीखताने विकत घेतली. सदर दोनही मिळकती मिळून एकत्रितपणे बांधकाम प्रकल्प करण्याबाबत आमचे अशील आणि मेघजी देढिया व हिरावती देढिया यांचेमध्ये ठरले होते. दोन्ही जमिनींबाबत बांधकाम परवानगी आणि बिनशेती परवानगी मिळविण्याचे काम चालू होते. तरीही सर्व्हे नंबर ४४/३ चे दोनही सहमालकांनी तारीख ०६/०५/२०२४ रोजीच्या पत्राने सामंजस्य करार रद्द केल्याबाबत आमचे अशिलांस कळविले आहे.

सदरबाबत आमचे अशिलांनी तारीख ०३/०६/२०२४ रोजीच्या उत्तराने मेघजी देढिया आणि हिरावती देढिया या दोघांना अशाप्रकारे करार एकतर्फा रद्द करता येत नाही असे कळविले असून, सदर प्रकल्पाबाबतची बांधकाम परवानगी मिळविण्यापूर्वीच विविध कामांकरिता आमचे अशिलांनी केलेल्या खर्चाबाबत देखील कळविले आहे. त्याचप्रमाणे सदर दोनही जमिनींचा ताबा एकत्रितपणे आमचे अशिलांकडे आहे याचीही त्यांस जाणीव करून दिली आहे. आमचे अशिलांबरोबर ठरलेला व्यवहार डावलून सदर सर्व्हे नंबर ४४/३ बाबत अन्य कोणाही बरोबर व्यवहार करणेंस आमचे अशिलांची हरकत असल्याबाबत देखील सदर उत्तराने मेघजी देढिया आणि हिरावती देढिया यांस कळविले आहे. तरीदेखील आमचे अशिलांबरोबर ठरलेला सदर व्यवहार डावलून मेघजी देढिया आणि हिरावती देढिया हे दोघेही त्रयस्थ व्यक्तींबरोबर सदर जमिनीबाबत व्यवहार करण्याचे बोलत आहेत. त्यामुळे आमचे अशिलांनी लवकरच सदर जमिनीबाबत मेघजी देढिया आणि हिरावती देढिया यांचे विरुद्ध कोर्ट कारवाई करण्याचे ठरविले आहे.

त्यामुळे सर्व लोकांना याद्वारे असे कळविण्यात येत आहे की, कोणीही वरसोली सर्व्हे नंबर ४४ हिस्सा नंबर ३ या जमिनीबाबत मेघजी देढिया व हिरावती देढिया यांचेबरोबर कोणताही व्यवहार करू नये. अन्यथा आमचे अशिल सुरू करणार असलेल्या कोर्ट कारवाईमध्ये सदर व्यवहार करणार यांना देखील पक्षकार करण्यात येईल व त्यांनी केलेला व्यवहार अशिल करतील याची रद्दबातल ठरविण्याची मागणी आमचे सर्वांनी नोंद घ्यावी.

तारीख : २०/०७/२०२४ **ॲड. राजेंद्र मधुसूदन कुंटे**
शांतादुर्गा को ऑप. हौसिंग सोसायटी,
मारुती नाका, अलिबाग, रायगड.

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक मनिंदर जीत उर्फ जितसिंग कम्बो व कुलविष कौर मनिंदर कम्बो यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे कुशिवली, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| ४१/४ | एकुण ०-६८-२० हे आर पॉ या एकुण क्षेत्रापैकी वरील मालक यांचे मालकीचे क्षेत्र ०-३४-१० हे आर पॉ एवढे क्षेत्र | ८-६४ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लोज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हवक हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २०/०७/२०२४
**ॲड. निलेश कान्हु मोरे मोबा. ९८२२६९१११०९**
**ॲड. वृषाली रघुनाथ मोरे मोबा. ८५३०१४३८५४**
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत त्याचे मालक १) चंद्रभागा शंकर ऐनकर व इतर यांचे कडून कायमची विकत घेण्याचे ठरले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : खांडस, तालुका : कर्जत, जिल्हा : रायगड**

| स.नं./हि.नं. | क्षेत्रफळ हे.आर चौ. मी | आकार रू.पै. |
|---|---|---|
| ६/८ | ०.३५.०० क्षेत्रापैकी विकत घेतलेले क्षेत्र १९ गुंठे | ०.३३ |

वर नमूद केलेल्या मिळकतीच्या संबंधात कोणास काही कायदेशीर हक्क, अधिकार व हितसंबंध, गहाण, दान, फरोक्त, वहिवाट, दावा, करार, बोजा, वहिवाट, वारसा, मृत्युपत्र, बक्षीसपत्र, विसारा, पावती, साठेखत, जनरल मुखत्यारपत्र, बँकेचे अगर कोणत्याही प्रकारची हरकती व कोणत्याही प्रकारचा बोजा असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपले वकिला/प्रतिनिधी मार्फत ही जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेलेच्या दिवसापासून १४ दिवसांचे मुदतीत आपल्या हरकती लेखी व कागदपत्रांसोबत कळवाव्यात, जर नमूद केलेल्या मुदतीत कोणीही हरकती न कळविल्यास कोणाचीही काही एक हरकत नाही असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार करतील याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे नोटीस आहे. **ॲड. ज्ञानेश्वर हरिश्चंद्र राणे**
दि. १९/०७/२०२४ २०२, तैयब अर्पा, दुसरा मजला,
सेन्टल बँकेच्या मागे, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.
मो. ९४२२०७१११२

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की मौजे मुगपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील नोंदीस वर्णन असलेल्या जमीन मिळकती, सदर मिळकतींचे विद्यमान मालक मेलोडी मेकर रिसोर्टस प्रायवेट लिमिटेड यांचेकडून आम्ही विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे मुगपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत.**

| स.नं. | हिस्सा नंबर | क्षेत्र (आर.बी.मी) | आकार रु. पै |
|---|---|---|---|
| १ | १ | ०-४३-०० | ५.०७ |
| १ | २ | १-६०-६० | १७.८२ |
| २ | १ | ०-८६-९० | ३.०० |
| २ | ३ | ०-२२-०० | १.५६ |
| २ | ४ | ०-४०-०० | ०.३४ |
| ४ | १ ब | ०-१६-७० | ०.४८ |
| ९ | १ | ०-१८-५० | ०.९७ |
| ९ | २ | ०-०३-०० | ०.११ |
| ४७ | १० | ०-३२-५० पैकी ०-१६-५० इतके मालकीचे क्षेत्र | ०.८३ |
| ४७ | ८ | ०-२७-९० पैकी ०.०३.०० इतके मालकीचे क्षेत्र | ०.३१ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हकहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील पत्त्यावर हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा ) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

तारीख २०/०७/२०२४ खरेदीदारातर्फे,
**श्री. ऋषभ चंद्रकांत लाड,**
बी.ई. एल एल बी
पत्ता: फ्लॅट नं २३, दुसरा माळा, रोसवूड बिल्डिंग, ललानी रोड, दहिवली, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
फोन नं ८६५७२२२९९९
Email-rushabhlad@gmail.com

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)
ज.म. र अर्ज १४/२०२३

प्रति,
श्रीम. शालिनी नथुराम मोहिते
रा. रांजणपाडा, पो. आवास — अर्जदार
ता. अलिबाग, जि. रायगड
विरुध्द
ग्रुप ग्रामपंचायत आवास,
मु. आवास — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे मौजे रांजणपाडा येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांचे पती कै. नथुराम दादू मोहिते यांचा मृत्यु दि ०७/०४/२००४ रोजी ग्रामपंचायत आवास येथील रांजणपाडा येथील राहत्या घरी झाला होता.

२. मात्र त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत आवास येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यु दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत आवास यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि.२०/०७/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि.१८/०७/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग सही/-
तारिख : १८/०७/२०२४ **(विक्रम पाटील)**
तहसिलदार अलिबाग

---

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**

---

## शुद्धीपत्रक

दैनिक कृषीवल पेपर मध्ये दिनांक १८/७/२०२४ रोजी लागलेल्या ॲड. राजीव नथुराम शेरमकर यांच्या नोटीसीमध्ये नजरचुकीने मौजे म्हात्रोळी गट नं २३१/१ आणी गट नं २३१/१ असे झाले आहे त्या ऐवजी मौजे म्हात्रोळी गट नंबर २३१/१ आणी गट नं २३१/२ असे वाचण्यात यावे ही विनंती.

सही/-
**ॲड. राजीव नथुराम शेरमकर**
रा.समर्थ को ऑप हौसिंग सोसायटी
रोहिदास नगर, चेंढरे अलिबाग रायगड

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, मौजे निगुडशेत, ता. तळा, जि. रायगड येथील गट नं. ३८९ ही मिळकत आमचे अशिलांनी खरेदी घेण्याचे ठरविले असून या मिळकतीबाबत मिळकतींच्या मालकांव्यतिरिक्त इतर कोणाचा काही हक्क हितसंबंध, गहाण, तारण, लिज, पोटगी, निवाडा, भाडेपट्टा अगर अन्य प्रकारे हितसंबंध असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसात खाली सही करणार यांचेकडे लेखी कागदोपत्री पुराव्यासह हरकती दाखल कराव्यात, या मुदतीत हरकती न आल्यास मिळकती निर्वेध असल्याचे समजून या मिळकतींबाबत पुढील व्यवहार केले जातील व त्याप्रसंगी कसलीही तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. याकरिता जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे.

अ) मिळकतीचे वर्णन- मौजे निगुडशेत, ता. तळा, जि. रायगड येथील मिळकत, तिचे वर्णन खालीलप्रमाणे,

| गट नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू. पैसे) | जमिन मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| ३८९ | १-७५-०० पो.ख. ०-५९-०० २-३४-०० | ०.५२ | श्री. रामचंद्र विठ्ठल मंचेकर व इतर सर्व |

माणगांव सही/-
दिनांक : १८/०७/२०२४ **ॲड. राहुल प्र. ओक**
'मानस', मुंबई - गोवा हायवे
पो. ता. माणगांव, जि. रायगड.
मो.नं. ८८८८३७३००५
(खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट)

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे चोंढी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक हायपॉईंट ॲग्रोस्टार प्रा. लि. तर्फे डायरेक्टर अल्पना समीर चिनॉय व जयदेव मुकुंद मोदी यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| चोंढी | ९६ | ०-४८-०० पो. ख. ०-०९-०० ०-५७-०० | ०.८६ |

**पैकी पुर्व दिशेकडील ० हेक्टर १६.०० आर एवढी मिळकत.**

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग सही/-
तारीख : २०/७/२०२४ **ॲड. गणेश गोविंद पाटील**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

---


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते की, श्री. राजेंद्र पांडुरंग घोंगे, रा. गोंदाव यांनी या कार्यालयात पांडुरंग साधुराम घोंगे यांच्या मृत्यु नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज सादर केला आहे. सदर अर्जात त्यांनी प्रतिज्ञापत्राद्वारे त्यांचा मृत्यु दि. ०६ डिसेंबर २०१९ रोजी मौजे गोंदाव ता. सुधागड. जि. रायगड येथे झाला आहे, परंतु त्याची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे नमुद केले आहे.

सदरहू पांडुरंग साधुराम घोंगे यांच्या मृत्यु नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरूपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे मृत्यु नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसव्दारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

सदर नोटीस पेपर नोटीस प्रसिद्धीकरीता माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली आहे.

ठिकाण:- सुधागड पाली
दिनांक :- २०/०७/२०२४

सही/-
**(उत्तम कुंभार)**
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी सुधागड

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलानी मौजे सालपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील नमुद केलेली मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालकाकडुन कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत त्या मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमच्या पक्षकारांस संमती दिली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पैसे | विद्यमान मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| सालपे | १७/९ | ००-३६-४० | ०.४६ | रामभाऊ रमेश शेळके |

सदरची मिळकत निर्वेध असल्याबाबत त्या मिळकतीच्या मालकांनी हवाला दिलेला आहे. तरी सदर वर वर्णन मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विकी, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तकारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रे पुराव्यासहीत सादर करावी.

सदर मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तकार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे. असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही तकार अगर हरकत राहील्यास ती विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

पनवेल **ॲड. राजेश र. खैरे**
तारीख १९/०७/२०२४ ३ बी/२१, कल्पतरु रिव्हरसाईड पार्क,
तक्का, पनवेल, पनवेल- रायगड,
४१०२०६
मो. ९९२०६०९८८८

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की मौजे नांगुर्ले ता. कर्जत जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे आशिलांनी कब्जेदारांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे नांगुर्ले ता. कर्जत जि.रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे आर. पॉ.) | आकार (रू पै) |
|---|---|---|---|
| १) दौलत वामन देशमुख<br>२) प्रमोद एकनाथ देशमुख<br>३) प्रवीण एकनाथ देशमुख<br>४) शोभा अनिल देशमुख<br>५) वासंती एकनाथ देशमुख<br>६) कुंदा एकनाथ देशमुख<br>७) मंगल सखाराम देशमुख<br>८) रविंद्र सखाराम देशमुख<br>९) रमेश सखाराम देशमुख<br>१०) मोरेश्वर सखाराम देशमुख<br>११) पुष्पा भरत देशमुख<br>१२) मिलन भरत देशमुख<br>१३) दिपाली संतोष देशमुख<br>१४) सिंधु रामचंद्र देशमुख<br>१५) निलेश रामचंद्र देशमुख<br>१६) आशा अरूण देशमुख<br>१७) वैशाली किसन गरूड<br>१८) वर्षा प्रदिप हलपतराव<br>१९) अलका निलेश शिंदे<br>२०) बबन भिक देशमुख<br>२१) श्री अशोक भिकु देशमुख<br>२२) किसाबाई विश्वनाथ देशमुख<br>२३) उषा शरद देशमुख<br>२४) नागेश शरद देशमुख<br>२५) महेश शरद देशमुख<br>२६) गिता उमेश देशमुख | ४४ | एकुण क्षेत्र १७-९७-०० यापैकी विकत देणार यांच्या अविभक्त हिश्याचे क्षेत्र १३-०७-७५ गुंठे | ७-३१ |
| २७) ऊंकार दिलीप खिसमतराव<br>२८) वनिता रामचंद्र झेमसे | ४४ | यांचे मालकीचे सामाईक क्षेत्र ०-४०-०० गुंठे | ०-३७ |

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षिस, वहीवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत सकृतदर्शनी पुराव्यासह खाली नमुद ॲडव्हाकेट यांचेकडे सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १० (दहा) दिवसाचे आत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध बोजारहीत असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
ता. २०/०७/२०२४ **ॲड. महेश कमलाकर थोरवे**
मो.नं.८००७५३७६५६ रा. कर्जत ता. कर्जत जि.रायगड

## निवडक

### अदानींची ‘आयपीएल’ एन्ट्री

**नवी दिल्ली :** अदानी समूह लवकरच इंडियन प्रीमियर लीगमध्ये प्रवेश करू शकतो. आयपीएल संघातील भागभांडवल विकत घेण्यासाठी अदानी समूहाची चर्चा सुरू आहे. असे झाले तर पुन्हा एकदा अंबानी-अदानी व्यवसायात एकाच मैदानात उतरतील.आयपीएलमध्ये उद्योगपती संघ फ्रँचायझीचे मालक आहेत. अदानी आयपीएल संघ गुजरात टायटन्समधील कंट्रोलिंग स्टेक खरेदी करू शकतात. खाजगी फर्म कॅपिटल पार्टनर्स टायटन्समधील हिस्सा विकण्यासाठी अदानी समूहाशी चर्चा करत आहे.

### माजी कर्णधाराची हत्या

**नवी दिल्ली :** श्रीलंकेच्या अंडर-१९ संघाचा कर्णधार असलेला माजी क्रिकेटपटू धम्मिका निरोशन याची मंगळवारी रात्री अंबालानगोडा येथील घरात गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. स्थानिक पोलिसांनी पुष्टी केली आहे की अज्ञात हल्लेखोराने निरोशनच्या घरात प्रवेश केला आणि त्याच्यावर गोळ्या झाडल्या, तेव्हा तो त्याची पत्नी आणि दोन मुलांसोबत होता.ही घटना गेल्या मंगळवारी, १६ जुलै रोजी अंबालानगोडा येथील धम्मिका निरोशन यांच्या घरी घडली.

### श्रेयस अय्यर पुन्हा संघात

**नवी दिल्ली :** आयपीएल २०२४ चे खिताब पटकवलेल्या केकेआर संघाचा नेतृत्व करणारा स्टार फलंदाज श्रेयस अय्यर पुन्हा एकदा टीम इंडियात परतला आहे. श्रीलंकेविरुद्ध खेळल्या जाणाऱ्या ३ सामन्यांच्या वनडे मालिकेसाठी तो भारतीय संघासोबत जोडला गेला आहे. या वर्षाच्या सुरुवातीलाच अय्यरसह ईशान किशनलाही अनुशासनहीनतेच्या आरोपाखाली बीसीसीआयने संघातून वगळण्यात आले होते. श्रेयस अय्यरला बीसीसीआयच्या वार्षिक करारमध्ये लवकरच समावेश करण्यात येणार आहे.

### हुड्डा अडकला विवाहबंधनात

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट संघाचा स्टार खेळाडू दीपक हुड्डा विवाहबंधनात अडकला आहे. त्याने त्याच्या प्रेयसीसोबत सातफेरे घेतले. शुक्रवारी हुड्डाने त्याच्या आयुष्याची नवीन सुरुवात केली. दीपक हुड्डाने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इन्स्टाग्रामवर लग्नाचे फोटो शेअर केले आहेत. यासोबत त्याने एक भारी कॅप्शन लिहिले, ज्याने क्रिकेट वर्तुळाचे लक्ष वेधले. दीपकने लिहिले की, अखेर नऊ वर्षांची प्रतीक्षा संपली आहे. प्रत्येक क्षण, प्रत्येक स्वप्न आणि प्रत्येक संवाद आम्हाला या सुंदर दिवसाकडे घेऊन आला आहे.

### अर्जेंटिना संघ अव्वल

**नवी दिल्ली :** जागतिक फुटबॉल संघटना अर्थात फिफाने युरो आणि कोपा अमेरिका स्पर्धा पूर्ण झाल्यानंतर जाहीर केलेल्या क्रमवारीत विश्व आणि कोपा स्पर्धा सलग दुसऱ्यांदा जिंकणाऱ्या अर्जेंटिनाने अव्वल स्थान कायम राखले. याचवेळी भारतीय संघही १२४ या क्रमांकावर कायम राहिला. विश्वविजेतेपद मिळवल्यानंतर त्यांनी आता कोपा अमेरिका स्पर्धेचे विजेतेपद कायम राखले. फ्रान्स दुसऱ्या क्रमांकावर कायम आहे. युरो करंडक विजेतेपदामुळे स्पेन पाचव्या स्थानावर आहे.

## महिला आशिया चषक स्पर्धेत

# भारत-पाकिस्तान आमनेसामने

**। दम्बुला । वृत्तसंस्था ।**

**महिलांच्या आशिया चषक ट्वेन्टी-२० क्रिकेट स्पर्धेला आज, शुक्रवारपासून सुरुवात होणार असून गतविजेत्या भारताची सलामीलाच पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानची गाठ पडणार आहे. ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या दृष्टीने ही स्पर्धा महत्त्वाची मानली जात आहे.**



भारतीय संघाची आशिया चषकात मक्तेदारी राहिली आहे. भारताने चारपैकी तीन वेळा ट्वेन्टी-२० प्रारुपातील, तर चार वेळा एकदिवसीय प्रारूपातील आशिया चषकाचे जेतेपद मिळवले आहेत. ट्वेन्टी-२० प्रारूपात भारताने २० पैकी १७ सामने जिंकले आहेत. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने २०२२ च्या स्पर्धेतील अंतिम सामन्यात बांगलादेशला नमवले होते. पाकिस्तानविरुद्ध भारताने या स्पर्धेत १४ पैकी ११ सामन्यांत विजय मिळवला आहे. आता भारतीय संघाचा प्रयत्न हीच दमदार कामगिरी कायम राखण्याचा असेल. भारताने या महिन्याच्या सुरुवातीला झालेल्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या ट्वेन्टी-२० मालिकेत १-१ अशी बरोबरी नोंदवली.

भारतासाठी सलामीची फलंदाज स्मृती मनधाना पूर्ण लयीत आहे. तसेच गोलंदाजांनीही गेल्या काही काळात चांगली कामगिरी केली आहे. वेगवान गोलंदाज पूजा वस्त्रकारने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तीन सामन्यांत आठ गडी बाद केले, तर फिरकी गोलंदाज राधा यादवनेही चमक दाखवली. भारतीय संघात दीप्ती शर्मा, सजीवन साजना आणि श्रेयांका पाटील या फिरकीपटूंचाही समावेश आहे.

पाकिस्तानने आशिया चषकासाठी निदा दारकडे नेतृत्वाची धुरा सोपवली आहे. मात्र, संघात बरेच बदल करण्यात आले आहेत. ईरम जावेद, ओमैमा सोहेल आणि सैयदा आरूब शाह यांना प्रथमच संघात स्थान मिळाले आहे.

## ऑलिम्पिकमध्ये सोनेरी यशाचेच ध्येय -सिंधू

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

गेल्या दोन ऑलिम्पिकमध्ये अनुक्रमे रौप्य आणि कांस्यपदक मिळवल्यानंतर यंदा एक पाऊल पुढे जात सोनेरी यश मिळवण्याचे ध्येय भारताची आघाडीपटू बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधूने बाळगले आहे. २६ जुलैपासून सुरू होणाऱ्या पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत दमदार कामगिरीचा सिंधूला विश्वास आहे.

ऑलिम्पिकमध्ये भारताच्या अभिनव बिंद्रा आणि नीरज चोप्रा यांनाच वैयक्तिक सुवर्णपदक जिंकता आले आहे. गेल्या दोन ऑलिम्पिक स्पर्धांतील यशानंतर सिंधूला आता ऑलिम्पिकमधील भारताची पहिली महिला सुवर्णपदक विजेती म्हणून इतिहास घडवण्याची संधी आहे. या ऐतिहासिक कामगिरीसाठी उत्सुक असून त्या दृष्टीनेच तयारी करत असल्याचे सिंधूने सांगितले. पॅरिसमध्ये ऑलिम्पिक कारकीर्दीतील तिसरे पदक मिळवण्यासाठी मी उत्सुक आहे. यंदा सुवर्णपदकाचेच माझे ध्येय आहे. अन्य स्पर्धा आणि ऑलिम्पिकमध्ये खूप फरक आहे. ऑलिम्पिकला वेगळेच महत्त्व आहे आणि या स्पर्धेत नेहमीच माझे २०० टक्के देऊन खेळते,असे सिंधू म्हणाली.२०१६ आणि २०२० च्या स्पर्धेमध्ये पदकापर्यंत पोहोचण्यासाठी मी प्रचंड मेहनत घेतली होती. पॅरिस येथे होणारी स्पर्धाही याला अपवाद ठरणार नाही. नव्या जोमाने या स्पर्धेत उतरेन आणि काहीही झाले तरी १०० टक्के देऊनच खेळेन, असा विश्वास सिंधूने व्यक्त केला.



## टी२० संघाचे सूर्यकुमारकडे नेतृत्व

### ■ श्रीलंका दौऱ्यासाठी रोहित, कोहली एकदिवसीय संघात

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताचा नवनियुक्त प्रशिक्षक गौतम गंभीरने आपल्या पहिल्याच संघ निवडीत काही आश्चर्यकारक निर्णय घेतले असून श्रीलंका दौऱ्यातील तीन साम न्यांच्याट्वेन्टी-२०मालिकेसाठी सूर्यकुमार यादवकडेनेतृत्वाची धुरा सोपवण्यात आली आहे. त्याच वेळी तारांकित अष्टपैलू हार्दिक पंड्याला उपकर्णधारपदापासूनही दूर ठेवण्यात आले आहे. ट्वेन्टी-२० आणि एकदिवसीय अशा दोन्ही संघांच्या उपकर्णधारपदी शुभमन गिलची नियुक्ती करण्यात आली.



तसेच एकदिवसीय संघात कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचाही समावेश करण्यात आला आहे.भारतीय संघ श्रीलंका दौऱ्यात प्रत्येकी तीन सामन्यांची टी-२० आणि एकदिवसीय मालिका खेळणार आहे. टी-२० मालिकेचे सामने अनुक्रमे २७, २८ आणि ३० जुलैला, तर एकदिवसीय सामने अनुक्रमे २, ४ आणि ७ ऑगस्टला कोलंबो येथे खेळविण्यात येणार आहेत. रियानला दोन्ही मालिकांसाठी संघात स्थान मिळाले असून श्रेयस आणि केएल राहुल यांचा एकदिवसीय संघात समावेश आहे.

## इंग्लंडच्या संघाचा अवघ्या २६ चेंडूत विश्वविक्रम

**। नॉटिंगहॅम । वृत्तसंस्था ।**

वेस्ट इंडिजविरुद्धची पहिली कसोटी इंग्लंडने एकतर्फी जिंकली. दिग्गज गोलंदाज जेम्स अँडरसनची ही शेवटची कसोटी होती. त्याला शेवटच्या कसोटीत विजयी निरोप मिळाला. त्यानंतर आज दुसऱ्या कसोटीला सुरुवात झाली. वेस्ट इंडिजच्या संघाने नाणेफेक जिंकली आणि इंग्लंडला प्रथम फलंदाजीला आमंत्रित केले. इंग्लंडच्या सलामीवीरांनी ही संधी अजिबात दवडली नाही. त्यांनी तुफान सुरुवात केली आणि सामन्याच्या अवघ्या २६ चेंडूत कसोटी क्रिकेटमध्ये विश्वविक्रम रचला.

इंग्लंडच्या संघाने दुसऱ्या कसोटीत एक मोठा विक्रम केला.

**१४७ वर्षांच्या इतिहासात असं पहिल्यांदाच घडलं!**

नॉटिंगहॅम कसोटीत इंग्लंडच्या फलंदाजांनी असे काही केले जे कसोटी क्रिकेटच्या १४७ वर्षांच्या इतिहासात प्रथमच घडले. इंग्लंड संघाने वेस्ट इंडिजविरुद्ध केवळ ४.२ षटकांत ५० धावांचा टप्पा पार केला. त्यांनी एक विश्वविक्रम रचला. यापूर्वीही हा विक्रम इंग्लंडच्याच नावावर होता. १९९४ साली दक्षिण आफ्रिकेविरुद्ध इंग्लंडने ४.३ षटकात ५० धावांचा टप्पा ओलांडला होता, पण आता ३० वर्षांनंतर त्यांनी स्वत:चा विश्वविक्रम मोडला.

## ‘आईसाठी ऑलिम्पिक गाजवायचंय’

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पॅरिसमध्ये १०० मीटर हर्डल्सच्या प्राथमिक फेरीत ज्यावेळी ज्योती स्टार्टिंग ब्लॉकवर पाय ठेवेल, त्यावेळी तिच्या आईचा सकारात्मक दृष्टिकोन तिच्यासोबत असेल. जागतिक रँकिंगच्या माध्यमातून पॅरिस ऑलिंपिकसाठी पात्र ठरलेली ज्योती ऑलिंपिक १०० मीटर हर्डल्स शर्यतीत भाग घेणारी पहिली भारतीय होय.



आधी मी माझ्या घरची परिस्थिती, वैयक्तिक जीवन आणि परिवारामुळे खूप विचार व चिंता करायची, असे ज्योती म्हणाली. माझी परिस्थिती कधी-कधी खूप वाईट असते. कारण माझी आई म्हणते, आपण वर्तमान, भूतकाळ व भविष्यकाळ थांबवू शकत नाही, त्यामुळे पुढे चालत राहा. तू फक्त तुझ्यासाठी मेहनत करीत राहा, जो निकाल येईल, तो स्वीकार करायचा.

माझी आई मला कधीही स्पर्धेच्या आधी सुवर्णपदक किंवा पदक जिंक असे म्हणत नाही. तिचे म्हणणे एवढेच असते की, तंदुरुस्त राहा, जे काही करशील, त्याबद्दल आनंदी व समाधानी राहा. त्यामुळेच मी सकारात्मक मानसिकतेने पुढे जात असते, असे ज्योतीने सांगितले.

> **ऑलिम्पिकमध्ये खेळण्याचा मला अनुभव नसला तरी आशियाई अॅथलेटिक्स, आशियाई क्रीडा स्पर्धा, जागतिक स्पर्धेचा अनुभव माझ्या पाठीशी आहे. तो अनुभव मी पॅरिसमध्ये प्रत्यक्षात आणेल. पॅरिसमधील स्पर्धा प्रचंड आव्हानात्मक असली तरी मी माझ्या शर्यतीवर लक्ष केंद्रित करणार आहे आणि सरावात जे केले ते शर्यतीत उतरविण्याचा माझा प्रयत्न राहील.**
>
> **- ज्योती यराजी**

सकारात्मक मानसिकतेने आपण भूत आणि भविष्यकाळाचा फारसा विचार न करता आपण आपले वर्तमान उंचावू शकतो, असेही ती मला म्हणते, असेही ज्योतीने सांगितले.

## ऑलिम्पिक पदकांचे आयफेल टॉवर कनेक्शन

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पॅरिस ऑलिम्पिक आणि पॅरालिम्पिकच्या आयोजकांनी या वर्षी ८ फेब्रुवारी रोजी पदकांचे अनावरण केले होते. यावेळी पदक जिंकणारे खेळाडू फक्त पदक नव्हे तर आयफेल टॉवरचा एक तुकडाही घरी घेऊन जातील. कारण यंदा पदकाचा काही भाग आयफेल टॉवरच्या तुकड्यांचा बनलेला आहे. ऑलिम्पिक स्पर्धा २६ जुलै ते ११ ऑगस्ट दरम्यान, तर पॅरालिम्पिक २८ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या कालावधीत होणार आहेत.



जगातील सर्वात मोठ्या क्रीडा स्पर्धेसाठी एकूण ५०८४ पदके तयार करण्यात आली आहेत. यातील मेडल्समध्ये १८-ग्राम हेक्सागन टोकन असणार आहे. गेल्या काही वर्षांत केलेल्या आयफेल टॉवरच्या स्मारकाच्या नूतनीकरणादरम्यान त्यातून निघालेल्या लोखंडापासून यंदाची पदके बनवलेली आहेत. प्रत्येक ऑलिम्पिक गेम्सप्रमाणे, यंदाही ऑलिम्पिक पदकाची दुसरी बाजू ग्रीसमधील ऑलिम्पिक गेम्सच्या पुनर्जन्माची कथा सांगते, ज्यामध्ये विजयाची देवी आणि एलेना व्होत्सीने अथेन्स ऑलिम्पिक्स २००४ साठी डिझाइन केलेल्या स्टेडियमचा समावेश आहे. २००४ पासून पदकाचे एक पारंपारिक वैशिष्ट्य म्हणजे विजयाची देवी, अथेना नायके, पॅनाथेनाइक स्टेडियममधून समोरच्या बाजूने बाहेर पडतानाचे चित्र आहे. हे स्टेडियम १८९६ मध्ये ऑलिम्पिक खेळांच्या पुनरुज्जीवनाचे साक्षीदार होते. अशा प्रकारे, ग्रीसमधील प्राचीन खेळांची प्रेरणा, आधुनिक ऑलिम्पिक खेळांची फ्रेंच उत्पत्ती आणि पॅरिसमधील त्यांची पुढील स्पर्धा या सर्व गोष्टींचे यंदाचे मेडल्स प्रतिनिधित्व करतात.

याचबरोबर पॅरालिम्पिक पदकांवर आयफेल टॉवरचे चित्र असणार आहे. त्याचबरोबर त्यावर टॉवर फ्रॉम पॅरिस २०२४ असे ब्रेल लिपीमध्ये लिहिलेले आहे. याद्वारे फ्रेंच लेखक लुई ब्रेल यांना श्रद्धांजली वाहण्यात आली आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- Tally अकाऊंट कामाचा अनुभव असलेली लेडीज हवी आहे. ८००७८३३२३२ झिराड, पगार १८०००/२१०००
- Graduate candidates required for office in Alibag Call 9422383099 For interview between 11 am to 6 pm

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## मार्शल आर्टमध्ये पेण संघ उपविजेता

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

गतका मार्शल आर्ट ही रायगड जिल्हास्तरीय चॅम्पियनशिप स्पर्धा नुकतीच अलिबागमध्ये पार पडली. या स्पर्धेत पेणच्या मुला-मुलींनी सुवर्ण कामगिरी करत द्वितीय क्रमांकाचा चषक पटकावला.




उत्कृष्ट कराटेपट्टू अशांक पाटील याने दुहेरी सुवर्णपदक पटकावून तो रायगड जिल्ह्याचा आणि त्या चॅम्पियनशिपचा पहिला विद्यार्थी ठरला. सुचित म्हात्रेनी स्ट्रीट फाईटमध्ये सुवर्णपदक, प्रतीक म्हात्रे याने स्टिक रोटेशनमध्ये सुवर्ण, आणि साईराज पाटील याने अंतिम सामन्यात अलिबागच्या मुलाचा पराभव करून सुवर्णपदक तसेच दिया म्हात्रे हिने उत्कृष्ट कामगिरी बजावून सुवर्णपदक पटकावले.

आदित्य झिंजे, सुरज म्हात्रे, पेणची सुवर्णकन्या सेजल पाटील हिने प्रेक्षणीय स्ट्रीक फाईट प्रकारात विजय मिळवला असून सम्रा कांबळे, सानिया म्हात्रे हिने पहिल्यापासूनच स्ट्रीट फाईटमध्ये सुवर्णपदक पटकावले. एकूण ११ सुवर्णपदके संपादन करून रायगड जिल्ह्यात द्वितीय क्रमांक मिळविला. जिल्हा संघटनेची कार्याध्यक्ष अलिबागच्या नयना शिलदनकर व जिल्हा संघटनेचे अध्यक्ष संतोष कवळे, जिल्हा संघटनेचे सचिव रोहन अरुण गुरव यांच्या हस्ते चषक देण्यात आले. या विजयी स्पर्धकांची राज्यस्तरीय गतका असोसिएशन ऑफ महाराष्ट्र चॅम्पियनशिपसाठी निवड करण्यात आली आहे.

## रविंद्र म्हात्रे यांना ज्येष्ठ कबड्डी पंच पुरस्कार

**। गडब । वार्ताहर ।**

रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे आंतरराष्ट्रीय कबड्डी पंच रविंद्र म्हात्रे यांना महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनने ज्येष्ठ कबड्डी पंच पुरस्काने सन्मानित केले आहे.


रविंद्र म्हात्रे १९८९ पासून रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या माध्यमातून कबड्डी मध्ये सक्रिय आहेत.२००५-०६ ते २००८-०९ या कालावधी करीता त्यांची महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या पंच मंडळ समितीवर सदस्य म्हणून नियुक्ती झाली होती. २००७ मध्ये कर्नाळा स्पोर्टस् अकॅडमी पनवेल येथे झालेल्या दुसऱ्या विश्वचषक कबड्डी स्पर्धेमध्ये रविंद्र म्हात्रे यांनी पंच म्हणून काम केले आहे. महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनने नाशिक, रायगड, ठाणे, सोलापूर, पुणे आदी ठिकाणी घेतलेल्या राज्यस्तरीय पंच परीक्षांमध्ये त्यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले आहे. पुणे व कोल्हापूर येथे झालेल्या अखिल भारतयि कबड्डी पंच परीक्षांमध्ये त्यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले आहे. राज्यस्तरीय व राष्ट्रीय कबड्डी स्पर्धामध्ये पंच आणि पंचप्रमुखाचे काम केले आहे.महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनने घेतलेल्या पंच उजळणी वर्ग शिबिरांमध्ये सखोल मार्गदर्शन केलेले आहे.

## कुस्तीपटूनी जिंकली आहेत ७ पदके

# ऑलिम्पिकमध्ये भारतीय कुस्तीपटूंचा असणार दबदबा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

**पॅरिस ऑलिम्पिक २६ जुलैपासून सुरू होणार आहे. यंदाच्या ऑलिम्पिकमध्ये ११० हून अधिक भारतीय खेळाडू सहभागी होणार आहेत. गेल्या टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारतानं कुस्तीमध्ये २ पदकं जिंकली होती. या ऑलिम्पिकमध्ये देखील भारतीय कुस्तीपटूंकडून पदकाची अपेक्षा आहे. भारतानं ऑलिम्पिकच्या इतिहासात कुस्तीमध्ये एकूण ७ पदकं जिंकली आहेत.**



खशाबा जाधव हे स्वतंत्र भारताचे पहिले वैयक्तिक पदक विजेते होते. त्यांनी १९५२ च्या ऑलिम्पिकमध्ये कुस्तीच्या ५७ किलो वजनी गटात कांस्यपदक जिंकलं होतं. आश्चर्याचं म्हणजे, सुरुवातीला त्यांची संघात निवड झाली नव्हती. मात्र नंतर पटियालाच्या महाराजांच्या विनंतीवरून त्यांना संघात स्थान मिळालं. खशाबा जाधव यांना पुन्हा ऑलिम्पिकमध्ये खेळण्याची संधी मिळाली नाही आणि ते महाराष्ट्र पोलिसात रुजू झाले.

यानंतर कुस्तीत भारताचं दुसरं पदक थेट २००८ बिजिंग ऑलिम्पिकमध्ये आलं. या ऑलिम्पिकमध्ये सुशील कुमारनं पुरुषांच्या ६६ किलो वजनी गटात कांस्यपदक जिंकलं होतं. सुशील कुमारनं २०१२ लंडन ऑलिम्पिकमध्ये देखील चमकदार कामगिरी करत आपल्या पदकाचा रंग बदलला. यावेळी त्यानं रौप्य पदक मिळवलं. यासह स्वतंत्र भारतात २ पदकं जिंकणारा तो पहिला खेळाडू ठरला. लंडन ऑलिम्पिकमध्येच योगेश्वर दत्तनं पुरुषांच्या फ्रीस्टाइल ६० किलो वजनी गटातकांस्यपदक जिंकलं. ऑलिम्पिक पदक जिंकणारा तो तिसरा भारतीय कुस्तीपटू ठरला. २०१६ रिओ ऑलिम्पिकमध्ये साक्षी मलिक पदक जिंकणारी पहिली भारतीय म हिला ठरली. तिनं ५८ किलो वजनी गटात कांस्यपदक पटकावलं. ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकणारी ती एकमेव भारतीय महिला कुस्तीपटू आहे. यानंतर २०२० टोकियो ऑलिम्पिकमध्ये बजरंग पुनिया आणि रवी दहिया यांनी पदकं जिंकली होती. बजरंग पुनियानं कांस्यपदक जिंकलं. तर रवी कुमार दहियाला रौप्यपदकावर समाधान मानावं लागलं होतं.

# लखनौची खासियत

मुलांनो, आपला देश, त्यातील विविध शहरे, त्यांची वैशिष्ट्ये जाणून घ्यायलाच हवी. आज आपण उत्तर प्रदेशातील लखनौ बद्दल काही माहिती घेऊ या. या शहराला नवाबांचे शहर म्हटले जाते. हे शहर प्रवाशांना दिली जाणारी उत्तम वागणूक, आदरातिथ्य, संस्कृती, धार्मिक स्थळे आणि खाद्यपदार्थ यासाठी देशभर प्रसिद्ध आहे. येथे तुम्हाला आकर्षक मनोरंजन स्थळे आणि संपूर्ण शहरात पसरलेल्या ब्रिटीश काळातील भव्य इमारती पाहायला मिळतील.

**जाणून घ्या**



मित्रांनो, तुम्ही बडा इमामबाडा पाहू शकता. याला असफी इमामबाडा असेही म्हणतात. लखनौच्या सर्वात खास इमारतींपैकी ही एक आहे. या शहरातील घंटाघरचे रंगीत कारंजेही बघण्यासारखे आहे. कारंज्यासोबत संगीताचे फ्युजन तुम्हाला नक्कीच आवडेल. येथे येणाऱ्या सगळ्या मुलांना हा शो खूप आवडतो. तुम्ही हा शो पाहण्यासाठी संध्याकाळी ७:३० वाजता तेथे जाऊ शकता.

या शहरातील गंगा मत्स्यालयही बच्चेकंपनीच्या आवडीचे ठिकाण आहे. 'नॅशनल ब्युरो ऑफ फिश जेनेटिक रिसोर्सेस इन्स्टिट्यूट' या संस्थेत माशांच्या संवर्धनावर काम चालते. सकाळी नऊ ते चार या वेळेत तुम्ही येथे भेट देऊ शकता. दुपारी चार नंतर तिकीट मिळणार नाही, हे मात्र नक्की लक्षात ठेवा. मुलांसाठी २५ रुपये आणि प्रौढांसाठी ३० रुपये इतके इथले तिकीट आहे. इथे तुम्हाला अनेक रंगांचे आणि विविध प्रकारचे मासे बघायला मिळतील. शालेय गटासह येणाऱ्या मुलांसाठी १० रुपये तिकीट आहे. तेव्हा घरात ट्रिप ठरवली जात असेल तर लखनौचा नक्की विचार करा.

# गॉल्डियन फिंचच्या विश्वात...

**सजीवसृष्टी नानाविध प्राणी, पक्षी, वनस्पती, जलचर यांनी सजलेली आहे. विविध प्रकारच्या पक्ष्यांनी आपली धरा संपन्न आहे. पण पक्ष्यांबद्दलची आपली माहिती मर्यादित स्वरुपाची असते. अनेक पक्ष्यांना आपण ओळखतही नाही. गॉल्डियन फिंच हासुद्धा असाच एक पक्षी. चला तर मग, रेन्बो बर्ड या नावानेही ओळखल्या जाणाऱ्या या पक्ष्याविषयी जाणून घेऊ या.**





जगात पक्ष्यांच्या अनेक जाती-प्रजाती पहायला मिळतात. वेगवेगळ्या गुणवैशिष्ट्यांनी युक्त असलेले हे पक्षीगण सृष्टीतील महत्त्वपूर्ण घटक आहेत. गॉल्डियन फिंच हा असाच एक सुंदर आणि आकर्षक असा पक्षी! त्याच्या शरीरावर अनेक रंग असतात. उत्तर ऑस्ट्रेलिया, न्यू गयाना आणि आसपासच्या परिसरात तो आढळतो. तो गवताळ भागात राहतो. नदीकिनारी असलेल्या झाडांवरही तो राहतो. साडेपाच ते सहा इंच आकाराचा हा पक्षी गवताच्या बियांवर वाढतो. त्याच्या शरीरावर तीन ते चार रंग असतात. या पक्ष्याकडे बघत बसावं असं वाटतं. बहुसंख्य फिंचचा चेहरा काळपट असतो तर काही फिंचचा चेहरा मरून, तपकिरी रंगाचा असतो. सर्वसाधारणपणे काळ्या तोंडाचे फिंच आढळतात. पिवळ्या किंवा सोनेरी रंगाच्या चेहऱ्याचे फिंचही असतात पण त्यांचं प्रमाण फारच कमी आहे. या पक्ष्यांचं घरटं गोलाकार असतं. ते छान पोहतात. नर आणि मादी मिळून पिलांची काळजी घेतात. पिलांची एक गंमत असते मित्रांनो... चोचीच्या बाजूला चमकणारा उंचवटा असतो. रात्रीच्या वेळी पिलांना भरवताना चोच दिसावी यासाठी ही सोय करण्यात आली असावी! सुरूवातीला पिलांना पंख नसतात. मोठ्या पिलांचे पंख रंगीबेरंगी नसतात. काही काळानंतर त्यांचा रंग बदलतो.

**दोस्त हे मस्त**

# असा वाचवा मोबाईल डेटा!

मित्रांनो, इंटरनेट डाटा महिनाभर कसा पुरवायचा हे जाणून घेऊ या.

✻ स्मार्टफोनच्या सेटिंग्जमध्ये गेल्यावर डाटा लिमिट हा ऑप्शन दिसतो. सेटिंग्जमध्ये डाटा युसेज ऑप्शनमध्ये जाऊन तुम्ही डाटाचं लिमिट ठरवू शकता. या मर्यादेपर्यंत पोहोचल्यानंतर स्मार्टफोन डाटाचा वापर बंद करतो. यामुळे आपण किती डाटा वापरला हे कळू शकतं. या सेटिंगमुळे तुम्ही मोबाईल डाटा वाचवू शकता.

✻ डाटा मॅनेजमेंटची काही ॲप्स आहेत. ती डाउनलोड करून तुम्ही फोनमधला डाटा मॅनेज करू शकता.

✻ डाउनलोड सेटिंग्जमध्ये बदल करून तुम्ही डाटा वाचवू शकता. फोन आणि ॲप्सच्या सेटिंगमध्ये जाऊन डाउनलोड व्हेन वायफाय ऑन या पर्यायाची निवड करू शकता. यामुळे फोन वायफायशी जोडल्यानंतरच बऱ्याच गोष्टी डाउनलोड होतील आणि तुमचा डाटा वाचेल.




✻ जास्त डाटा वापरणाऱ्या ॲप्सची माहिती करून घ्या. या ॲप्सचा वापर कमी करा. नको असणारी ॲप्स डिलिट करून टाका.

**गॅझेट टॉक**

✻ बरीच लाईट ॲप्स सादर करण्यात आली आहे. फेसबुक लाईटपासून यू ट्यूब गो पर्यंत बरीच ॲप्स डाटा वाचवू शकतात. अशी ॲप्स डाउनलोड करून डाटाची बचत करा.

**ठिपके जुळवा**




# धबधबा बघायला जाताय?

मुलांनो, यंदाच्याच नव्हे तर प्रत्येक पावसाळ्यात धबधब्यात अचानक पाणी वाढल्याने पर्यटक वाहून गेल्याच्या घटना ऐकायला मिळतात.



खरे तर पावसाळ्यात धबधबे बघणे, तेथील निसर्गसौंदर्य अनुभवणे ही अतिशय सुखद गोष्ट असते. मात्र धबधबांच्या परिसरात जाताना कोणती काळजी घ्यावी हेदेखील बघायला हवे.

✻ धबधब्याच्या आजूबाजूला अनेक प्रशासकीय फलक लावलेले असतात. ज्यावर इशारे लिहिलेले असतात. या फलकांवर काय लिहिले आहे, याकडेही काही लोक दुर्लक्ष करतात. पण असे करणे धोकादायक ठरू शकते. धबधबा किती खोल आहे आणि तो जवळून पाहण्यासाठी कोणत्या टप्प्यापर्यंत जाता येईल, या सर्व सूचना फलकावर असतात. म्हणूनच त्या वाचा आणि नियमांचे पालन करा.

**काळजी घ्या**

✻ हवामान आणि वेळेचे भान ठेवूनच धबधब्याजवळ जावे. अनेकदा पावसाळ्यात नद्यांना पूर आल्यावर धरणाचे दरवाजे उघडतात आणि धबधब्याच्या पाण्याची पातळी अचानक वाढते. अशा परिस्थितीत धबधबा बघायला जात असाल तर त्यापासून सुरक्षित अंतर राखण्याची काळजी घ्या. पाण्याची वाढती पातळी पाहून त्याच उडी मारणे, खेळणे टाळायला हवे.

✻ धबधब्यांच्या आजूबाजूला धोका लक्षात घेता तेथे सेल्फी घेणे एखाद्या स्टंटपेक्षा कमी नसते, हे लक्षात घ्या. त्यामुळे धबधबा बघायला जात असाल तर दुरूनच छायाचित्रे टिपण्याचा प्रयत्न करा.

✻ धबधब्याच्या आजूबाजूचा भाग पाण्यामुळे निसरडा होतो. या निसरड्या वाटांवरुन तोल सांभाळता येण्यासाठी तुमच्या पायाची पकड टिकून राहतील अशी पादत्राणे घालावीत. अशा ठिकाणी उंच टाचांच्या चप्पल, स्लीपर्स घालू नये.

✻ अनेकजण धबधब्याला लागून असणाऱ्या खडकांवर बसतात. तिथल्या पाण्याने आंघोळही करू लागतात. पण कधीही असे करू नये कारण धबधब्याच्या पाण्याची पातळी वाढली की स्वत:वर नियंत्रण ठेवणे कठीण होऊन बसते.

# खेळामध्ये कारकिर्द घडवताना...



तुम्हाला खेळायला आवडतं ना... चांगला खेळ करुन बक्षीस मिळाल्यावर तुम्हाला आनंद होतो ना! मित्रांनो, खेळातील प्राविण्य, आवड तुमच्यासाठी कारकिर्दीची नवी वाट निर्माण करु शकते हे लक्षात घ्या. यासाठी काय गरजेचं आहे हेदेखील जाणून घ्या.

✻ कोणत्या खेळात करीअर घडवायचं आहे हे आधी ठरवा. आपलं व्यक्तिमत्त्व, शारीरिक क्षमता यांचा विचार करून निर्णय घ्यायला हवा. ✻ देशभरातल्या क्रीडा अकादमींमध्ये लहान वयातच मुलांना प्रवेश दिला जातो. क्रीडाक्षेत्रात करीअर करताना लहान वयातच सुरूवात करायला हवी. पाच ते आठ, नऊ ते चौदा तसंच पंधरा वर्षं किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या मुलांना अकादमींमध्ये प्रवेश दिला जातो. ✻ शालेय, महाविद्यालयीन स्तरावरच्या स्पर्धांमध्ये खेळाडू सहभागी होतात. यातूनच मुलांची कौशल्यं हेरली जातात. त्यांना घडवलं जातं. अकादमी मुलांचा कल आणि आवड हेरते. त्यानुसार खेळाची निवड करण्याविषयी मार्गदर्शन केलं जातं. ✻ खेळाडू बनण्यासाठी प्रचंड मेहनत करावी लागते. पण अभ्यासावरही लक्ष केंद्रित करायला हवं. प्रत्येकजण खेळात यशस्वी होतोच असं नाही. त्यामुळे इतर पर्यायही खुले ठेवणं गरजेचं आहे. ✻ खेळाडू होता आलं नाही तरी खेळाशी संबंधित इतर क्षेत्रांचा विचार करता येईल. स्पोर्टस फिटनेस तज्ज्ञ, स्पोर्टस मॅनेजर, समालोचक अशा विविध भूमिका तुम्ही पार पाडू शकता. ✻ क्षेत्र कोणतंही असलं तरी यश मिळण्यासाठी मेहनत करावी लागते हे लक्षात घ्या.

**कोण होणार**

# सूर्य रंग बदलतो?

दिवस उजाडतो तसतसा प्रकाशाचा एक लाल-पांढरा गोळा म्हणजेच सूर्य उगवतो. दिवस पुढे सरकतो आणि संध्याकाळी सूर्य मावळतो तेव्हा सूर्याची आभा सोनेरी-पांढ्या रंगाच्या वलयाने चमकदार दिसते. मग हे सगळे पाहून सूर्य खरोखरच रंग बदलतो असे तुम्हाला वाटते का? चला तर मग, शोधू या याचे उत्तर.

मुलांनो, सूर्याच्या प्रकाशात तीन प्रकारचे रेडिएशन असतात. अतिनील किरण, दृश्यमान प्रकाश आणि इन्फ्रा लाल किरण म्हणून ते ओळखले जातात. दृश्यमान प्रकाश आपण बघू शकतो. मात्र अतिनील किरण आणि इन्फ्रा-लाल किरण आपल्याला दिसू शकत नाहीत. दृश्यमान प्रकाशाचे किरण पांढरे असत असले तरी त्यात तांबडा, निळा, हिरवा, पिवळा, नारिंगी, लाल आणि जांभळा असे सात रंग असतात हे तुम्ही जाणताच.



तेव्हा पृथ्वीवरील धूळ, वायू आणि हवेचे कण आदी घटक सूर्याच्या प्रकाशामध्ये वेगवेगळ्या दिशेने विखुरतात. जांभळ्या प्रकाशात एक विलक्षण गुणधर्म असल्यामुळे तो सर्वात जास्त प्रमाणात विखुरला जातो तर लाल रंग कमीत कमी पसरतो. त्यामुळेच आपल्याला प्रत्येक प्रहरात सूर्याचा रंग वा त्यापासून येणारा प्रकाश वेगवेगळ्या रंगाचा दिसतो.

**लक्षात घ्या**

सूर्योदयाच्या वेळी पृथ्वी सूर्याकडे फिरत असते तर सूर्यास्ताच्या वेळी ती सूर्यापासून थोड्या दूर फिरत असते. या काळात सूर्यप्रकाशाला एका कोनात प्रवास करावा लागतो आणि त्यामुळे किरणांना वातावरणातून जास्त अंतर कापावे लागते. त्याच्या मार्गात आणखी अडथळे येतात. त्यामुळेच बहुतेक रंग प्रकाश पृथ्वीवर येण्यापूर्वीच विखुरले जातात. पण लाल रंग कमीत कमी विखुरलेला जात असल्याने हाच रंग आपल्यापर्यंत पोहोचताच दिसतो. दुपारच्या वेळी सूर्य थेट डोक्यावर असतो तेव्हा तो पांढरा दिसतो. कारण सूर्यप्रकाशाला वातावरणातून खूप कमी अंतर पार करावे लागते आणि त्याला कमी अडथळ्यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे किरण मोठ्या प्रमाणात विखुरण्यापासून वाचतात. मात्र मावळतीला पुन्हा एकदा सूर्यप्रकाशामध्ये विविध रंगांची उधळण दिसते. त्यामुळे अस्ताला जाणाऱ्या सूर्य पांढरा दिसत नाही.

# ऐतिहासिक कुतूहल



अलिकडेच स्टेलेनबॉश युनिव्हर्सिटीच्या शास्त्रज्ञांनी दक्षिण आफ्रिकेतील नामाकुआलँड येथे बफेल्स नदीच्या कडेला जगातील सर्वात जुने, वस्ती असलेल्या वाळव्यांचे वस्तीस्थान शोधून काढले आहे. ३४,००० वर्षे जुने असणारा हा वारुळासारखा ढिगारा भूतकाळातील जीवन, हवामान आणि कार्बनसाठा याबद्दल शास्त्रज्ञांनी नवी माहिती देऊन शकतो. तज्ज्ञांच्या मते, युरोपमधील प्रसिद्ध गुहा चित्रांपेक्षाही ते जुने असू शकते. तेव्हा या भागात विस्तीर्ण बर्फाच्या चादरींनी बराचसा भाग व्यापलेला होता. असे असताना हे प्राचीन ढिगारे वा वारुळे सापडणे आश्चर्यच मानायला हवे. या ढिगाऱ्यांचा अभ्यास करून, शास्त्रज्ञांना कार्बन वेगळा करण्यासाठी निसर्गाच्या प्रक्रियेचा वापर करून हवामान बदलाचा सामना कसा करायचा हे अधिक चांगल्या प्रकारे समजू शकते.

**करून पहा**

ही बाब आपल्या नैसर्गिक जगाचे रक्षण करण्याचे महत्त्वदेखील अधोरेखित करते कारण हे छोटे अभियंते हजारो वर्षांपासून आपल्या पर्यावरणाचे जतन करत आहेत. हे सर्व खरोखरच हवामान, पर्यावरण आणि पृथ्वीवरील जीवन यांच्यातील नाजूक परस्परसंबंधांची आठवण करून देणारे आहे. त्यामुळे सध्या या ऐतिहासिक कुतूहलाने अनेक संशोधक भारलेले आहेत.

# वाऱ्याची वर्गवारी



दिसत नाही पण जाणवतं ते काय, असं कोडं कोणी घातलं तर तुम्ही हवा हे उत्तर देऊन मोकळे होता. हवा आहे म्हणून आपलं अस्तित्व आहे हेदेखील तुम्ही जाणता. पृथ्वीचा पृष्ठभाग सगळीकडे सम प्रमाणात तापत नाही. या असमतोलामुळे हवेची निर्मिती होते. पृथ्वीचा पृष्ठभाग वेगवेगळ्या घटकांनी बनला आहे. पाणी आणि जमीन समान नाही. यामुळे सूर्याची किरणं शोषून घेण्याचं प्रमाणही समान नसतं. वेग आणि दिशेद्वारे हवेचं मापन केलं जातं.

**रंजक विज्ञान**

पृथ्वीच्या काही भागावर सूर्याची किरणं थेट पडतात. यामुळे हा परिसर वर्षभर तापलेला असतो. काही प्रदेशात सूर्यकिरणं थेट पोहचत नाहीत. हा भाग तुलनेने थंड असतो. अशा परिस्थितीत थंड हवेच्या तुलनेत वजनाने कमी असलेल्या गरम हवेचं प्रमाण वाढतं. त्यानंतर थंड हवा वातावरणात शिरते आणि गरम हवेचा प्रभाव कमी होतो. यामुळे वारा वाहतो. खारे वारे, जमिनीवरून वाहणारे वारे अशी वर्गवारी केली जाते.

**चित्र रंगवा**



**जिज्ञासा**

## ओळखा पाहू...

१) मेंढीपासून आपल्याला काय मिळतं?
२) वस्तू खाली कशामुळे पडते?
३) ग्रेट ब्रिटन कोणत्या खंडात आहे?
४) आशिया खंडातल्या सर्वात मोठ्या वाळवंटाचं नाव काय?
५) पेंग्विन काय खातात?
६) दुसरं महायुद्ध कधी संपलं?
७) आयर्लंडची राजधानी कोणती?
८) ब्राउन रंग कोणत्या दोन रंगांच्या मिश्रणाने तयार होता?
९) ९ गुणिले ११ किती?
१०) स्टॅच्यु ऑफ लिबर्टी कोणत्या शहरात आहे?

उत्तर : १) लोकर २) गुरुत्वाकर्षण ३) युरोप ४) गोबी ५) मासे ६) १९४५ ७) डब्लिन ८) लाल आणि हिरवा ९) ९९ १०) न्यूयॉर्क

# दक्षिण कोरियाविषयी...

आशिया खंडाच्या अतिपूर्वेकडे कोरिया वसलेला आहे. कोरियाचं दोन भागांमध्ये विभाजन झालं आहे. दक्षिण आणि उत्तर कोरियाचे असे या देशाचे दोन भाग असले तरी आजही इथल्या लोकांना अखंड कोरियाच लक्षात राहतो. दक्षिण आणि उत्तर कोरिया एकमेकांचे शत्रू आहेत. आज आपण दक्षिण कोरियाबद्दल जाणून घेऊ या.

दक्षिण कोरियामधील बराचसा भाग डोंगराळ आहे, पण इतर देशांमधल्या डोंगरांच्या तुलनेत इथले डोंगर लहान आहेत. पाऊस आणि वाऱ्यामुळे इथल्या पर्वतशिखरांची झीज होत गेली. इथल्या पर्वतांची उंची ३३०० फुटांपेक्षा कमी आहे. प्रचंड आर्द्रता आणि पावसामुळे दक्षिण कोरियातल्या जेजू बेटांवर तसंच दक्षिणेकडच्या पट्ट्यात जंगलं वाढली आहेत. कोरियाची लोकसंख्या बरीच जास्त आहे. गेल्या दहा हजार वर्षांपासून कोरियामध्ये लोकवस्ती आहे. सध्याच्या कोरियन लोकांचे पूर्वज मंगोलिया आणि सायबेरियातून आल्याचं तज्ज्ञांचं मत आहे.



१९५० मध्ये इथल्या डाव्या विचारांच्या लोकांमुळे कोरियन युद्धाला सुरूवात झाली. कोरियाच्या उत्तर भागातले लोक दक्षिणेकडच्या लोकांना त्रास देऊ लागले. १९५३ पर्यंत हे युद्ध सुरू राहिलं. अधिकृतपणे ते कधीच संपलं नाही. दक्षिण कोरिया हा पूर्व आशियातला एक सक्षम देश आहे. त्यांची अर्थव्यवस्था मजबूत आहे. दक्षिण कोरियामधून बोटी, गाड्या, कॉम्प्युटर आणि इतर इलेक्ट्रॉनिक वस्तूंची निर्यात होते. सेऊल ही दक्षिण कोरियाची राजधानी आहे. इथले लोक कोरियन भाषा बोलतात. वॉन हे इथलं चलन आहे.

**जगाच्या पाठीवर**

# कलासक्त

**माणसाचे भाग्य तरी किती बलशाली असावे? अवघ्या बारा वर्षाचे वय माझे पण सर्व काही स्वप्नवत घडत होते. माझ्यामध्ये आणि रंगमंचामध्ये अवघे दोन फूटांचे अंतर. समोर नटवर्य नारायण बोडस आहेत. साक्षात नृत्य आणि अभिनय सम्राज्ञी जयश्री गडकर नृत्य गायन आणि अभिनयाने प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फेडत आहेत. यापेक्षा मोठे भाग्य ते कोणते. नाटक होते 'गोकुळचा चोर' मातृवत्सल भूमिका होती जयश्री गडकर यांची. अप्रतिम गात होत्या त्या. लहान वयातही मी मंत्रमुग्ध झालो होतो. अर्थात इतक्या लहान वयात मला अभिनय आणि गायन काय असते हे काहीच कळत नव्हते.**



## अभिनय आणि नृत्य सम्राज्ञी

# जयश्री गडकर

श्रीराम शेटये

जयश्रीबाईंच्या त्या नाटकातल्या आठवणी कायमच्या लक्षात राहिल्या. १९८०-८२ वर्ष असावे. चौथी पाचवीला प्राथमिक शाळेत शिकणारा मी. तळकोकणातल्या मालवण तालूक्यातील गोळवण हे आमचे गाव. गावातली वस्ती तिनशे साडेतिनशे घरांची. पण पंचक्रोशीत खबर जायची आणि आजूबाजूच्या गावातील ग्रामस्थ बाया, बापडे, पोरटोर गर्दी करायचे. गावात नाटक किंवा पडद्यावरचा सिनेमा असला की प्रचंड उत्साह असायचा. गावात एकही नाट्यगृह अथवा थिएटर नव्हते.

मग प्राथमिक शाळेच्या प्रांगणात नाटक अथवा सिनेमा दाखवले जात असत. हिंदी आणि मराठी चित्रपट आणि रंगभूमीवर देखील जयश्रीबाईंनी अत्यंत ताकदीने अभिनय केला. अभिजात सौंदर्य सुसंकृत अविष्कार, एखाद्या भूमिकेत हुबेहूब शिरण्याची लकब. गायन आणि नृत्यावरही पराकोटीचा पगडा. यामुळेच मराठी चित्रपट सृष्टीत त्या दिर्घकाल कार्यरत राहिल्या.

१९ फेब्रुवारी १९४२ मध्ये कर्नाटक मधील कणसगिरी या छोट्याश्या खेडेगावात जयश्रीबाईंचा जन्म झाला. हे गाव ता. सदाशिवगड, जिल्हा कारवार येथे आहे. लहाणपणीच त्या मुंबईत आल्या. खेतवाडीच्या नगरपालिकेच्या शाळेत प्राथमिक शिक्षण घेतले. गिरगावातील राम मोहन हायस्कुलमधून माध्यमिक शिक्षण घेतले.

निर्माते दिग्दर्शक व्ही. शांताराम यांच्या 'झनक झनक पायल बाजे' (१९५५) या गाजलेल्या चित्रपटात नायिका संध्या यांच्याबरोबरच एका समुह नृत्यात काम करण्याची संधी त्यांना मिळाली. रशियाचे नेते न्यिकित खुश्चाव्ह हे भारतात आले असता त्यांच्यासाठी सादर केलेल्या एका कार्यक्रमात त्यांनी 'लटपट लटपट तुझं चालणं' या गाण्यावर नृत्य केले होते. त्याची छायाचित्रे प्रसिद्ध निर्माता दिग्दर्शक दिनकर पाटील यांनी पाहिली आणि त्यांनी 'दिसतं तसं नसतं' या चित्रपटात त्यांनी जयश्री गडकर यांना नृत्याची संधी दिली. हा त्यांचा खऱ्याअर्थी पहिला चित्रपट ठरला.

नंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. भालजी पेंढारकर यांची निर्मिती असणाऱ्या राजा परांजपे दिग्दर्शित 'गाठ पडली ठका ठका' (१९५६), या चित्रपटात जयश्रीबाईंना नायिका म्हणून प्रथम संधी मिळाली. या चित्रपटात बाबूराव पेंढारकर, राजा गोसावी, रमेश देव, गणपत पाटील अशा दिग्गज कलाकारांसोबत काम करण्याची संधी जयश्रीबाईंना मिळाली.यानंतर राजा गोसावी यांच्या सोबत 'आलीया भोगासी'(१९५७) हा चित्रपट केला. 'सांगते ऐका'(१९५९) या तमाशाप्रधान चित्रपटात त्यांनी सहाय्यक अभिनेत्रीची भुमिका केली. या चित्रपटात हंसा वाडकर, चंद्रकांत, सुर्यकांत, रत्नमाला, वसंतराव पेहलवान अशा आघाडीच्या कलाकारांसोबत काम करत असताना जयश्रीबाईंच्या अभिनयाचा कस लागला. त्यांची या चित्रपटातील भुमिका दुय्यम असुनही त्यांचे नाव एकदम प्रकाशझोतात आले. हा चित्रपट खुप गाजला. पुण्यातल्या विजयानंद चित्रपटगृहात १३२ आठवडे चालून त्यांने विक्रम केला. त्यातले 'बुगडी माझी सांडली गं' हे गाणे विशेष गाजले. जयश्रीबाईंच्या नृत्याविष्कारातील चापल्य आणि अभिनयामुळे हे गीत इतकी वर्ष उलटली तरी रसिकांच्या स्मरणात आहे.

त्यानंतरही त्यांच्या 'सवाल माझा ऐका' (१९६१) व 'मल्हारी मार्तण्ड' या तमाशाप्रधान चित्रपटांना खुप प्रसिद्धी मिळाली. त्यातील भुमिकेचेही खुप कौतूक झाले. या दोन्ही चित्रपटातील 'सोळावं वरीस धोक्याचं', 'कस काय पाटील बर हाय का?', 'फड सांभाळ तुऱ्याला गं आला', 'पदरावरती जरतारीचा मोर नाचरा हवा' या लावण्या जयश्रीबाईंनी आपल्या अमर्याद नृत्याविष्कार आणि अभिनयाने अजरामर केल्या.

१९६४ साली प्रदर्शित झालेला 'मानिनी' चित्रपट आला आणि तमाशाप्रधान चित्रपटात काम करण्याचा शिक्काही त्यांनी पुसून टाकला. हा चित्रपट सुप्रसिद्ध दिग्दर्शक अनंत माने यांनी दिग्दर्शित केला होता. ज्येष्ठ रंगकर्मी आणि चित्रपट अभिनेते चंद्रकांत गोखले या चित्रपटात जयश्री गडकर यांचे नायक होते. गरीब पण स्वाभिमानी अशी मालतीची भुमिका त्यांनी अजरामर केली. या चित्रपटातील 'अरे खोप्यामध्ये खोपा', 'अरे संसार संसार', 'मन वढाय वढाय' ही गाणी त्या काळात खुप गाजली.

'मोहित्यांची मंजुळा' (१९६३) या ऐतिहासिक चित्रपटात त्यांनी पुरूष वेश धारण करून स्वराज्याच्या रक्षणार्थ उतरलेली मराठमोळी विरांगणा साकार केली होती. 'साधी माणसं' हा त्यांचा गाजलेला एक सामाजिक चित्रपट . यात त्यांनी लोहाराच्या भात्यावर काम करणाऱ्या सामान्य वाटणाऱ्या पण मनाने खंबीर अशा स्त्री ची भुमिका साकार केली होती.

सारंगा हा त्यांचा पहिला हिंदी सिनेमा देखील खुप गाजला. त्यातल 'सारंगा तेरे प्यार मे' हे गाणे अप्रतिम होते. आजही त्याची नजाकत कायम आहे. अनेक हिंदी पौराणिक चित्रपटात जयश्रीबाईंनी काम केले. अनेक दुरदर्शन मालिकाही केल्या. परंतू रामानंद सागर यांच्या रामायण मालिकेतील त्यांची कौसल्या ही भुमिकाही खुप लोकप्रिय झाली.

या मालिकेसाठी जयश्री गडकर यांना रामानंद सागर यांनी रामायण मालिकेच्या संदर्भात भेटायला बोलावले होते. तेव्हा त्यांच्या सोबत त्यांचे पती बाळ धुरी गेले होते. बाळ धुरी यांचे देखणे राजबिंडे व्यक्तिमत्त्व पाहून रामानंद सागर भाराऊन गेले. त्यांनी त्यांना रामायण मालिकेतील मेघनाथ किंवा राजा दशरथ यापैकी कोणतीही एक भुमिका निवडण्याची ऑफर केली. तेव्हा बाळ धुरी यांनी छोटीशी पण लोकांच्या कायम स्मरणात राहणारी राजा दशरथाची भुमिका केली. रामयणातील कौसल्या आणि दशरथ या दोन्ही भुमिका ऐतिहासिक ठरल्या.


बाळ धुरी आणि जयश्री गडकर यांचं लग्न झाले तेव्हा अनेकांना वाटलं होतं की हा प्रेमविवाह आहे. परंतू खरी कहाणी तशी नव्हती. बाळ धुरी हे पेशाने टेक्स्टाईल इंजिनियर होते. परंतू त्यांना नाटकात काम करायची खूप ओढ होती. त्या काळात गिरणी कामगारांच्या आंतरगिरणी नाट्यस्पर्धा होत असत. त्या नाटकांतून बाळ धुरी नाटकात काम करीत असत. त्यांचे 'काचेचा चंद्र' हे पहिले नाटक गाजले. सुप्रसिध्द नाट्यनिर्माते मोहन वाघ यांच्या चंद्रलेखा संस्थेची सर्वात जास्त नाटके बाळ धुरी यांनी केली होती. त्याच दरम्यान मोहन वाघ यांनीच जयश्रीबाईंसाठी बाळ धुरींचं स्थळ सुचवले होते. या दोघांचे लग्न ठरवून झालेले होते. ते प्रेमविवाह नव्हते. देखणे राजबिंडे भारदस्त आवाज असलेले बाळ धुरी आणि शालीन घरंदाज गुणी अभिनेत्री असलेल्या जयश्रीबाई म्हणजे शंकर पार्वतीचा जोडाच जणू. दोघांनीही हिंदी आणि मराठी चित्रपट विश्वात आपले नाव कोरले.

रामायण मालिकेतील त्या दोघांच्याही भुमिका अजरामर झाल्या. आजही लोक रामयणातील त्यांचे अभिनय केलेले मालिकेचे भाग तितक्याच आवडीने बघतात. दोघांनीही आपला संसार आणि आपले काम अत्यंत एकदिलाने केले . मराठी चित्रपट सृष्टीला या दोघांचेही फार मोठे योगदान आहे. ●●

# एका लग्नाच्या बऱ्याच गोष्टी!

स्वाती पेशवे

**अंबानींच्या घरातील शेंडेफळाचे लग्न संपन्न झाले आणि 'नांदा सौख्यभरे' असा आशीर्वाद देत सोहळ्याला उपस्थित राहणारी मंडळी आपापल्या घरी परतली. एखाद्या परिकथेतील राजकुमार आणि राजकुमारीचा विवाहसोहळा अनुभवल्याचे सुख या प्रसंगाने सर्वांनाच दिले. मात्र आता गोष्टीतील कथा आणि वास्तवातले कथानक याची तुलना आणि त्यावर चर्चा होणे स्वाभाविक आहे. यास्तव हा लेखनप्रपंच!**



आपल्या संस्कृतीमध्ये सोळा संस्कारांचे महत्त्व सांगितले आहे. विवाह हा त्यापैकीच एक संस्कार. आपल्या मुलामुलींचे दोनाचे चार हात करुन दिले, त्यांचे हात पिवळे झालेले बघितले की गृहस्थ आणि गृहिणीच्या प्रापंचिक आयुष्यातील एक महत्त्वपूर्ण जबाबदारी संपते आणि चार आश्रमांपैकी एक असणाऱ्या गृहस्थाश्रमातील प्रवास वेगळे वळण घेतो. एरवी घरोघरी पार पडणाऱ्या अशा आनंदसोहळ्यांचा परीघ त्या त्या कुटुंब आणि परिवारापुरता सीमित असतो. मात्र मुलांचे हात हळदीने नव्हे तर कांचनवर्णाने सोनेरी होत असतील, लग्नाचा एकूण खर्च पाच हजार कोटींच्या घरात असेल, त्या निमित्ताने देशोदेशीचे रथी-महारथी उपस्थिती नोंदवत असतील, पत्रिकेपासून परतवणीपर्यंतचा सगळा सरंजाम अवाक करणारा असेल तर असा सोहळा विश्वव्यापी ठरणारच. तसाच तो ठरला. देशातीलच नव्हे तर परदेशातील माध्यमांनीही तो जगभर पोहोचवला. सोशल मीडियाच्या माध्यमातून असंख्य लोकांनी तो पाहिला. प्रत्यक्ष लग्नाच्या आधीच्या आणि नंतरच्या कार्यक्रमांनी गजबजलेले वातावरण क्षणभर आपल्यालाही मांडववाऱ्यात लोटून गेले आणि वधूवरांना 'नांदा सौख्यभरे'चे सार्वत्रिक आशीर्वचन घुमवचन ऐकवत सोहळ्याची सांगता झाली. पण ही एका लग्नाची पहिली वा दुसरी गोष्ट नाही. कारण या निमित्ताने होणारी चर्चा अनेक गोष्टींची गुंफण करणारी आहे. त्यामुळेच ती कापूसकोंड्याची गोष्ट आहे, असे म्हणावे लागेल.

खरे पाहता आशिया खंडातील 'सर्वात श्रीमंत' असा अंबानी कुटुंबाचा उल्लेख होतो. यशाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या धीरुभाई अंबानी यांनी अवघ्या पाच हजार रुपयांपासून सुरू केलेल्या व्यवसायाचे रोपटे आज नानाविध शाखा-मुळांच्या रुपाने विस्तारले असल्यामुळेच पाच हजार कोटी रुपयांचा लग्नसोहळा पेलू शकले आहेत. त्यातही धाकटी पाती कमकुवत असताना मोठा भाऊ आणि ताकदवान उद्योजक या नात्याने सावरणारे मुकेश अंबानी पत्नी आणि मुलांकडे जबाबदारी सोपवत समजूतदार, धोरणी तसेच द्रष्ट्या गृहस्थाची भूमिका बजावत आहेत. राजकारणापासून मनोरंजनापर्यंत आणि खेळापासून कलाप्रांतापर्यंत सर्वांशी सौहार्द राखणारी त्यांची छबी अंबानी कुटुंबातील आधीच्या दोन टोलेजंग विवाहसोहळ्यांमध्ये आपण पाहिलीच आहे. साक्षात गानसरस्वती लता मंगेशकर यांच्या आवाजात रेकॉर्ड केलेला मंगलध्वनी त्यांच्या आधीच्या कार्यातही कानी पडला होता. यंदा या सर्वाचा कळस पहायला मिळाला इतकेच. मग हा कळस बराच काळ लांबलेल्याच नव्हे तर ताणलेल्या सेलिब्रेशनचा होता.

साजरीकरणाचा गाठलेला कळस महत्त्वाच्या व्यक्तींचा प्रवास सुखद होण्यासाठी एका राज्यातील विमानतळ काही काळासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे करण्याचा होता. फाटके कपडे आणि अर्धनग्न अवस्थेत कला सादर करणाऱ्या जागतिक कीर्तीच्या कलावंतांना कोट्यवधी रुपयांचे मानधन देऊन नाचवण्याचा होता. आपले निवासस्थानच नव्हे तर पंचक्रोशीतील संपूर्ण परिसर सुशोभित करत रस्ते अडवण्याचा होता. कोटींच्या घरातील प्रावरणांच्या आणि हिरे-माणकांच्या वापराचा होता. आलिशान गाड्या मिरवण्याचा होता. असंख्य फुलांची उधळण करणाऱ्या सजावटीचा होता. मंडपात उठलेल्या लक्ष जेवणावळीचा होता. एकंदरच या सोहळ्याने विवाहातील श्रीमंतीच्या दर्शनाचे सगळे मापदंड बदलून टाकले. कदाचित तो बघितल्यानंतर कोट्यधिशांनाही आपल्याकडचे कार्य फारच 'गरीब' झाल्यासारखे वाटले असेल. अंबानींकडच्या सुग्रास भोजनाने, कोटींच्या घरातील भेटवस्तूंनी अनेकांना आपल्याकडील 'तोकड्या संपत्ती'ची नव्याने जाणीव करुन दिली असेल. खरे पाहता वधुवराला महागडा व्हिला, आलिशान गाड्या, हिरेजडीत दागदागिने असे काहीबाही भेट देणारे उपस्थितांमधील कोणीच श्रीमंतीच्या व्याख्येबाहेरचे नाहीत. मात्र तरीही नजरेसमोर तारे चमकवून जाणारे हे प्रदर्शन अचाट आणि अफाट होते. त्यामुळे बघणाऱ्या प्रत्येकाने तोंडात बोट घातली नसतील तरच नवल.

खरे पाहता स्वकष्टार्जित कमाई कशा प्रकारे खर्च करावी, हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. त्यातून कोणतीही पार्श्वभूमी नसताना शून्यातून विश्व निर्माण केलेल्या अंबानी कुटुंबाने गोरगरिबांपासून सर्वसामान्यांपर्यंत सर्वांना आपल्या आनंदसोहळ्यात सहभागी करुन घेतले. अनेकांचे विवाह लावून नवविवाहितांना स्त्रीधन दिले. वर्षभर त्यांच्या संसाराची जबाबदारी घेतली. बंगल्याबाहेर सर्वसामान्यांसाठी भोजनाची सोय होती. या सोहळ्यात संस्कृतीचा सन्मान केला गेला.

लोकसंगीतापासून शास्त्रीय संगीतापर्यंत आणि साधू-संन्यास्यांपासून पुढाऱ्यांपर्यंत सर्वांची बडदास्त ठेवण्यात आली. अगदी प्राणी-पक्षीही त्यांच्या कृपाछत्रापासून वंचित राहिले नाहीत. त्यामुळे वेगाने वाढलेला व्यवसाय आणि वाढलेल्या उत्पन्नातून पार पडलेल्या या खर्चावर खरे तर आक्षेप घेण्याचे कारण नाही. अंबानींनी संधीचे सोने केले आणि अपार माया जमवली. संधी सगळ्यांनाच असते. मात्र सध्याच्या काळात तिची वानवा आहे. पराकोटीचे राजकारण, खिळखिळी झालेली व्यवस्था, नीतीमूल्ये हरवलेला समाज यामध्ये कुवत असणारा वर्गही मागे पडतो वा बळजोरीने मागे ठेवला जातो. संधीअभावी अनेक समाजघटक रोजच्या भाकरीच्या भ्रांतीतच अडकून पडतात. श्रीमंतांचे व्यवसाय सुलभ करण्यासाठी सवलतींची बरसात करणारी हीच यंत्रणा सर्वसामान्यांना नियमांच्या जंजाळात अडकवते. देशाचा नव्हे, तर जगाचा सोहळा पार पडलेल्या मुंबईमध्ये किती लोकांना दोन वेळचे जेवायला आणि स्वतंत्र खोलीत निजायला मिळते हे तपासले तरी उत्पन्नातील ही तफावत किती मोठी आहे, हे लक्षात येईल. आजवर जगाने भारतातील गरिबी बघितली आहे. उघडीवाघडी मुले, भिकारी, घुसमटून टाकणारी गर्दी, गलिच्छ वस्त्या पाहणाऱ्या जगाला कदाचित या सोहळ्याने भारतातील श्रीमंतीची भुरळ पडेलही; पण हे चित्र प्रातिनिधिक असल्याचे त्यांना वेगळे सांगावे लागणार नाही. त्यामुळे विवाहासाठी उपस्थित असलेले परदेशी व्यावसायिक अंबानींची तळी उचलतील, सर्वसामान्यांची नव्हे.

एक माणूस देश बदलू शकत नाही, हे मान्य असले तरी एक व्यवस्था मात्र माणसाचे विचार बदलू शकते. परिस्थिती बदलू शकते आणि विचार बदलले की समाज बदल्याखेरीज राहत नाही. अगदी मोजक्या रकमेमध्ये कुष्ठरोग्यांच्या साक्षीने विवाहबद्ध झालेल्या प्रकाश आणि मंदा आमटे या दांपत्याने अनेकांच्या आयुष्यात घडवून आणलेला बदल आपल्या डोळ्यासमोर आहे. त्यांनी पेटवलेली ज्ञान आणि आरोग्याची ज्योत एकाच नव्हे तर प्रत्येक दिवशी अनेकांच्या जीवनात रत्नतेज निर्माण करत आहेत. तेव्हा दुनिया मुठीत घ्यायची की आपल्या जीवितकाळात संकटाच्या मगरमिठीत अडकलेल्यांना साह्य करुन सन्मानपूर्वक जगण्याचा विश्वास द्यायचा, हे ज्याचे त्याने ठरवलेले चांगले. ●●

# कान्हा-मित्र




मागील दोन कवितांमध्ये कान्हा बालक म्हणून आणि कान्हा खेळगडी म्हणून कसा त्याचे सुरेख वर्णन कवीने कसे केले आहे ते आपण पाहिले, प्रस्तुत कवितेत कान्हा मित्र म्हणून कवीला कसा वाटतो याचे सुंदर वर्णन कवीने केले आहे.

श्रीकृष्णाचा परम मित्र अर्जूनाचे प्रेम सुवर्णकांती सुभद्रेवर जडले असताना तिला प्राप्त करणे अवघड होते. कारण श्रीकृष्णाचे मोठे बंधू बलराम यांचे मनात सुभद्रेचा विवाह दुर्योधनाबरोबर करून द्यायचा होता, परंतू श्रीकृष्णाने आपल्या मित्राच्या म्हणजे अर्जुनाच्या मनातील सुभद्रेवरचे प्रेम ओळखून अर्जुनाला सुभद्रेचे हरण करण्याशिवाय पर्याय नाही असा युक्तीचा सल्ला दिला आणि आपले अर्जूनाशी असलेले मित्रत्वाचे नाते सिद्ध केले. कर्णाचा वध कसा करावा हा प्रश्न अर्जुनाला पडला होता. कर्ण आणि पांडव विशेषतः अर्जूनाशी कर्णाचे संबंध प्रतिकूल होते. कर्णाला कवच आणि कुंडल ठेऊन महाभारतातील कोणीच त्याचा वध करू शकत नव्हते, अर्जुनाच्या क्रोधाला सामोरे जाण्याची कर्णाची हिंमत नव्हती परंतू कवच कुंडलांचं वरदान कर्णाला लाभले असल्याने कृष्णाने प्रेरीत होऊन अंजलिकशास्त्राचा वापर केला. ज्यामुळे कर्णाचा शिरच्छेद करणे अर्जूनाला शक्य झाले. याप्रकारे श्रीकृष्णाने अर्जूनाशी असलेले मित्रत्वाचे नाते सिध्द केले. आणि त्याला पडलेल्या प्रश्नाचे निराकरण केले.

त्याचप्रमाणे कौरव पांडव युद्धात समरांगणी श्रीकृष्णाने अर्जुनाच्या रथाचे सारथ्य करून त्याची संभ्रमावस्था दूर केली आणि त्या प्रसंगीही श्रीकृष्णाने आपण त्याचे खरे मित्र आहोत हे दाखवून दिले. मित्रासाठी एखादी शरीर व्याधी दूर करण्यासाठी श्रीकृष्ण हेच औषध असते तसेच एखादी क्षुद्र चिंता मन ग्रासून टाकते तेंव्हा श्रीकृष्णाचे मधूर शब्द मनाला शांत करतात. कसे जगावे या प्रश्नाचे उत्तर श्रीकृष्ण एका शब्दात देत असतात, कर्तव्य कोणते, आणि अकर्म कोणते, भोग कसे भोगावेत असे प्रश्न पडतात तेंव्हा हा मित्र निमिषार्धात धावून येतो आणि या पडलेल्या प्रश्नांची उकल क्षणार्धात करतो असा तो मित्र आहे. वर्षाकाळी म्हणजे पावसात तो गोवर्धन होतो, आणि भुकेलेल्यांसाठी अन्न पूर्णब्रह्म असा तो असतो जीवन कान्हा असतो. अर्थिक संकटात तो पाठिशी खंबीरपणे उभा राहतो.

विनोद थट्टांचा तर तो चाहता असतो. तो गाणी गातो, नृत्य करतो

'कृष्णगान'

शशिकांत मुद्देबिहाळकर

९७६७१५२६०८

मित्र म्हणून तो कान्हा मनाचे रंजनही करतो. मनी एखादी कल्पना सुचली तर खुशाल सांगावी त्याला, तो समजून घेतो, असा कोण दुसरा न्यारा आहे. म्हणूनच माझ्या सर्व सख्यांमधये तो प्रिय आहे. अहंपणाची भावना झाली तर मात्र एक चापटी ठेऊन द्यायला तो कमी करीत नाही. असत्य बोललो तर तत्क्षणी आक्षेप घेतो. वर्षाकाळी पूर येऊन नदी नाल्यातील जल जसे निर्मळ होते, कचरा वाहून जातो तसेच त्याच्या मधूर वचनांनी दुःख निवारून मन स्वच्छ होते. पुढे कवी कृष्णाच्या आनंदी वृत्तीचं सुरेख वर्णन करतो. एखाद्या लहान मुलासारखा तू उत्साही आणि आनंदाने बागडतोस, सुंदरींना भुलवून छळायचे कपटी योजन करतोस, अर्थात त्यांच्यावर येणारी संकटे, दूर करून त्यांच्या इच्छांना मान देतोस, म्हणूनच तूझा वियोग म्हणजे माझे जीवन संपणे असे असते. जेंव्हा तुझा राग येतो तेंव्हा काहीतरी विनोद करून तू आमचा राग शमवतोस. मनाला यातना होतात तेव्हा तूझे हे वागणे आनंदमयी असते, संकटात तूच धाऊन येतोस, आणि जवळ राहून ते निवारतोस,जसे दिव्यावर किटक येताच त्यांचे भस्म होते आणि अरिष्ट नष्ट होते. असत्य वर्तन तू ठेचून काढतोस, तुझ्या दिव्यत्वाने कोटी असत्ये पचून जातात, म्हणजे त्यांचा नाश होऊन जातो. नारींच्या गुणांनी मात्र तू वेडा होतोस, तेंव्हा जळासारखा मृदूल, शीतल भासतोस, कधीतरी मात्र क्रोधित परंतू अचल भासतोस.

शिवाच्या जटेपासून निर्माण झालेल्या 'वीरभद्र' गणाला मृत्यूदंडही लिलया देतोस, एखाद्या लहान बालकाप्रमाणे साधे सोपे निर्व्याज प्रेमाचे शब्द बोलतोस, सतूपुरूषांचे सदैव रक्षण करतोस,अप प्रवृत्तींना अग्नी सारखा किंवा व्याधी सारखा भासतोस, प्रितीची सुंदर मधूर गीते गाऊन मोहित करतोस, नयन मनोहर सुंदर चित्रे रेखाटून मैत्री करतोस, सकल कलांचा तू ज्ञाता आहेस अगदी कुठेही, समरांगणात सुध्दा.

वेदांमधील दिव्य ज्ञान जे साधक, मुनीवर, जाणतात त्यांच्या हृदयी तू वास करतोस, अनादि, अनंत, अक्षर आहेस तू, समरांगणी गीता सांगून मनाच्या ज्ञान ज्योतीला चेतवितोस, मनाला आनंद देणारा सखा तू आहेस, तूझी अप्रतिम गाथा गाताना मन आनंदाने भरून जाते. असे म्हणून कवीने ही कविता कान्हा मित्र कसा आहे त्याचे सुरेख वर्णन करून संपन्न केली आहे. ●●

**(कवि. प्रा. श्रीप्रकाश अधिकारी)**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)